नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

कै. भाऊजी दफ्तरी स्मृती
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

या अंकांत

उपनिषदर्थव्याख्या	डॉ. भाऊजी दफ्तरी
मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें	शंकर गोविंद चट्टे
अभिरुचि व कलेचें मूल्यमापन	नी. र. वऱ्हाडपांडे
ग्रंथसमालोचन	भ. श्री. पं. व म. अ. चा.

याशिवाय कविता, अभिप्राय, पत्रव्यवहार व संघवार्ता.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

वर्ष १० | संपादक | जुलै १९५५
अंक ४ | दि. ब. पंडित | किंमत आठ आणे

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वती जन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी वर्ष १० जुलै १९५५ अंक ४ रा

संपादक :
दि. ब. पंडित
संपादक मंडळ : डॉ. ना. के. महाजन, श्री तु. ना. काटकर, श्री म. अ. चान्सरकर,
श्री मा. नी. गलगलीकर, श्री रा. ना. घाटोळे.

उपनिषदर्थव्याख्या

डॉ. के. ल. ऊर्फ भाऊजी दप्तरी

लेखांक ३

कठोपनिषद्

ह्याच्या कालाचा व कर्त्याचा निश्चितपणें पत्ता लागत नाही. श्लोक १।११ मध्ये निर्दिष्ट केलेल्या उद्दालक आरुणीनें हें उपनिषद् केलें असेल. ह्यांतील कांहीं श्लोक थोडयाबहुत फरकानें भगवद्गीतेंतहि आले आहेत म्हणून हें भगवद्गीतेपूर्वीचें असावें. ऐतरेय केन, प्रश्न, कठ आणि मुंडक हीं भगवद्गीतेपूर्वीचीं होत हें केनोपनिषदाच्या प्रकरणांत दाखविलेंच आहे.

ग्रंथाची योजना—यम आणि नचिकेत ह्यांच्या संवादाच्या रूपानें हें उपनिषद् लिहिलें आहे. ह्याच्या सहा वल्ली आहेत. पहिल्या वल्लींत प्रास्ताविक हकीकत आहे. तींत यमानें नचिकेताला तीन वर देऊं केले व त्यांपैकी नचिकेतानें दोन मागितले व यमानें दिले, असें सांगितलें आहे. तिसराहि वर नचिकेतानें मागितला आणि यमानें आढेवेढे घेतले तरी तोच वर मला पाहिजे असें नचिकेतानें म्हटलें असेंहि ह्याच वल्लींत सांगितलें आहे. पुढील पांच वल्लींत तो वर पूर्ण करण्याकरितां आत्मज्ञान सांगितलें आहे. दुसऱ्या वराच्या हकीकतीकडे बहुतेक सर्वांनी दुर्लक्ष केलें आहे. तिचें स्वारस्य "सत्कर्म करावें" असें आहे हें आम्ही दाखवूं. दुसऱ्या वल्लींत आत्मज्ञानाची स्तुतीच बहुतेक आहे आणि तिसऱ्या वल्लींत मुख्य आत्मज्ञान आहे व पुढील तीन वल्लींत त्याचाच अनुवाद आहे.

कठोपनिषदाच्या मूळच्या वल्ली तीन होत्या व शेवटच्या तीन वल्ली प्रक्षिप्त आहेत असें कोणी म्हणतात आणि त्यास कारण असें देतात की तिसऱ्या वल्लीच्या शेवटीं समाप्ति दर्शक दोन श्लोक आहेत, आणि ३।१०-११ व ६।७-८ हे श्लोक परस्पर विरुद्ध आहेत. वास्तविक हे श्लोक परस्परविरुद्ध नाहीत, कारण इंद्रिय, अर्थ, मन, बुद्धि, महान्, अव्यक्त, परपुरुष ह्या ३।१०-११ येथील परंपरेंतील 'अर्थ' ६।७।८ येथें फक्त गाळला आहे. तेवढयानें विरोध सिद्ध होत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. माझें मत असें आहे की, ग्रंथकर्त्यानें प्रथमतः पहिल्या तीनच वल्ली लिहून ग्रंथ समाप्त केला आणि त्याला त्यानेच मागाहून पुढील तीन वल्ली जोडल्या, हें मानणेंच मला अधिक चांगलें वाटतें. कारण (१) द्वितीयार्धांतील विचारहि प्रथमार्धांतील विचारांइतकेच मार्मिक व सुंदर आहेत आणि दोनहि अर्धांतील श्लोकहि सौंदर्यांत सारखेच आहेत. (२) चवथ्या वल्लींतील पहिल्या दोन श्लोकांचा विषय, तिसरीच्या शेवटच्या श्लोकांतूनच म्हणजे "निचाय्य तं मृत्युमुखात्प्रमुच्यते" ह्या शब्दांतूनच काढला आहे. ही मार्मिक योजना मूळ ग्रंथकर्त्याशिवाय इतरांस सुचणें बहुतेक असंभवनीय आहे. (३) चवथ्या वल्लीच्या आरंभीं, ग्रंथारंभीं आरंभदर्शक कांही तरी वाक्य असावें तसें अगदीच नाही. ह्यामुळे मूळचे दोन स्वतंत्र ग्रंथ एकत्र जोडले गेले, ह्या कल्पनेचेंहि खंडन होतें. (४) नचिकेताच्या तिसऱ्या प्रश्नाचें उत्तर ५।६–७ येथेच आहे. म्हणून सर्व सहा वल्ली हा मूळचाच ग्रंथ होय अशीहि शंका घेण्याचें कारण नाही, कारण त्याच प्रश्नाचें उत्तर ३।७–८ ह्यांत आहेच.

सहाव्या वल्लीचा शेवटचा अठरावा श्लोक "मृत्युप्रोक्ताम्" इत्यादि प्रक्षिप्त आहे. कारण तो सतराव्यांत "तं विद्याच्छुक्रममृतं" या शब्दाची समाप्तिदर्शक द्विरावृत्ति केल्यानंतर आला आहे. शिवाय त्यांत ज्या योगाचें ६।१२–१३ येथें खंडन केलें आहे, तो योगविधि सांगितला आहे असें म्हटलें आहे. यावरून कोणीतरी गैरसमजानें तो प्रक्षिप्त केला असें दिसतें. प्रो. गर्द्रे यांचें मत भिन्न आहे. त्यांच्या मतें हा श्लोक प्रक्षिप्त मानण्याची गरज नाही; कारण "योगविधिं च कृत्स्नं" ह्या शब्दांत "योगाचें खंडन" हा अर्थ येऊं शकतो. मला हें ग्राह्य वाटत नाही. हा श्लोक प्रक्षिप्त असो किंवा नसो यांत "कृत्स्नं" ह्याऐवजी मूळ पाठ "कृत्तं" म्हणजे "खंडितम्" असा असण्याचा व पुढे गैरसमजानें तो "कृत्स्नं" असा केला असण्याचा संभव आहेच.

कठोपनिषदांत ब्रह्म, जीव आणि जिवाच्या दोन गति फार उत्तम प्रकारें वर्णिल्या आहेत. यमानें ज्ञान सांगितलें ह्या हकीकतींत परोक्षवाद आहे. त्याचा अर्थ मृत्यूचा विचार केल्यानें हें ज्ञान झालें असा दिसतो. येथें वाजश्रवसः म्हणजे ब्रह्म, नचिकेताः म्हणजे जीव, मृत्यूचें घर म्हणजे निद्रा, तीन रात्री म्हणजे निद्रेचेच आदि, मध्य व अंत हे भाग; तीन वर म्हणजे (१) निद्रेनंतर पुनः मागची सर्व आठवण होणें, (२) सत्कर्मज्ञान आणि (३) आत्मज्ञान होणें हे होत. "नाचिकेतं शकेमहि" ३।२ (आम्ही नाचिकेताचें वर्णन करूं शकतों) यावरूनहि नाचिकेत म्हणजे जीव हें स्पष्ट आहे.

"त्रियामा" म्हणजे रात्रि आणि रात्रि म्हणजेच झोपेचा काळ म्हणून झोपेचे तीन भाग व त्यांना अनुरूप असे तीन वर कल्पिले. ब्रह्माला आनंदाचा उपभोग घेण्याची इच्छा होती हें "उशन्" ह्या परोक्षवादाचें विवरण. "सर्ववेदसं ददौ" म्हणजे सर्व इंद्रियें उपभोगाच्या कामीं लाविलीं. "श्रद्धाविवेश" म्हणजे तो उपभोग घेतां घेतां जीवाला वाटलें की ह्या उपभोगापासून सुख नाही आणि सुखाचा दुसरा उपाय जाणण्याची उत्कट इच्छा [श्रद्धा] त्यास उत्पन्न झाली. म्हणून तो म्हणाला हीं इंद्रियें [गावः] कांही उपभोग घेऊन निर्बल झाल्यावर [दुग्धदोहा] पुनः उपभोगास लावणारा मनुष्य दुःखप्रचुर [अनंदाः] लोकास म्हणजे अवस्थेस जातो म्हणून तूं दुसरें कांही तरी दे, मलाच कोणास तरी देऊन टाक.

वाजश्रवसः—वाज म्हणजे अन्न खाण्याबद्दल ज्याची कीर्ति [श्रवस] आहे असा प्राण किंवा ब्रह्म म्हणजे शरीरस्थप्राण. त्याचाच पुत्र अहंकार, जीव् किंवा मनस् होय.

मृत्यु म्हणजे निद्रा असा अर्थ येथेच २।२५ मध्ये केला आहे व करावा लागला आहे.

"नचिकेत":—नं नकारं अभावं चिकित्सति म्हणजे ब्रह्मरूपांतील अभावाला जो दुरुस्त करतो तो म्हणजेच "जीव."

वल्ली पहिली

वल्ली १, श्लोक १–४:—

ॐ उशन् ह वै वाजश्रवसः सर्ववेदसं ददौ ।
तस्य ह नचिकेता नाम पुत्र आस ॥१॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तं ह कुमारं संतं दक्षिणासु नीयमानासु
श्रद्धा विवेश सोऽमन्यत ॥२॥
पीतोदका जग्धतृणा दुग्धदोहा निरिंद्रियाः ।
अनंदा नाम ते लोकास्तान्सगच्छति तादद‌त् ॥३॥
स होवाच पितरं तत कस्मै मां दास्यतीति
द्वितीयं तृतीयम् ।
तं होवाच मृत्यवे त्वां ददामीति ॥४॥

अर्थः—यज्ञफलाची इच्छा करणारा [उशन्] वाजश्रवस नांवाचा एक यजमान (यज्ञकर्ता) आपलें सर्व धन [सर्ववेदसम्] देता झाला. त्याला नचिकेता नांवाचा एक पुत्र होता ॥१॥ त्या चांगल्या मुलाला [संतं कुमारं] दक्षिणा नेल्या जात असतां बापाचें खरें हित करण्याची उत्कट इच्छा [श्रद्धा] उत्पन्न झाली. त्याला वाटलें की ॥२॥ ज्या पुनः पाणी पिणार नाहीत [पीतोदका] ज्या पुनः गवत खाणार नाहीत [जग्धतृणा] ज्यांचें पुनः दूध निघणार नाही [दुग्धदोहा] अशा दुर्बल झालेल्या [निरिंद्रियाः] गाई जो देतो, तो अनंद नांवाच्या म्हणजे आनंदरहित अवस्थेस [लोकाः] जातो. ॥३॥ तो बापास म्हणाला, "हे बाबा माझें दान तूं कोणास करतोस ?" तो मुलगा बापास, दुसऱ्याने व तिसऱ्यानेहि असें म्हणाला तेव्हा बाप म्हणाला मी तुझें दान मृत्यूला करतों. ॥४॥

टिप्पणें—उशन् म्हणजे कामयमानः म्हणजे इच्छा करणारा.

वेदसम् म्हणजे धनम्; "विंदते" ह्या धातूपासून हा शब्द झाला आहे.

निरिंद्रियाः म्हणजे दुर्बल. इंद्रिय म्हणजे बल असा अर्थ आहेच (आपट्यांचा कोश पहा).

पीतोदका—ह्याचा शब्दशः अर्थ "ज्यांनी पाणी प्यालें आहे त्या" असा होतो. पण "निरिंद्रियाः" ह्या विशेषणामुळे भावार्थ "ज्या पुनः पाणी पिणार नाहीत" असा होतो. "जग्धतृणाः" "दुग्धदोहा" ह्यांचाही भावार्थ अशाच प्रकारचा आहे.

वल्ली १, श्लोक ५ः—

बहूनामेमि प्रथमः बहूनामेमि मध्यमः ।
किंस्विद् यमस्य कर्तव्यम् यन्मयाद्यकरिष्यति ॥५॥

अर्थः—पुष्कळांमध्ये (परोक्षवादविवरणाने ब्रह्म, जीव, इंद्रियें व जगत् यांमध्ये) मी (म्हणजे जीव) पहिला आहे, निदान मध्यम म्हणजे दुसरा तरी आहे. (जीव ब्रह्मापेक्षा श्रेष्ठ असें उपनिषदांमध्ये पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे त्यांशीं हें जुळतें. जीव ब्रह्मापेक्षा श्रेष्ठ न मानला तरी तो ब्रह्माच्याच खालचा पण इतरांपेक्षा वरचा म्हणजे दुसरा तरी मानावाच लागतो. त्यांशींही हें जुळतें.) इतका मी चांगला असूनहि माझा बाप माझें दान यमाला करतो म्हणतो, तर यमास माझ्याकडून [मया] आज कोणतें कार्य [कर्तव्यम्] करून घ्यावयाचें आहे काय ? यमास माझ्याकडून कांही तरी मोठें कार्य करून घ्यावयाचें आहे असा भाव. ॥५॥

टिप्पणें:—मुडंक २।२।१-२ येथे जीवाला "सदसद्वरेण्यं" आणि "वरिष्ठं प्रजानां" हीं विशेषणें लाविलीं आहेत. त्यांवरून, ब्रह्म, जीव, इंद्रियें व जगत् ह्या सर्वांमध्ये जीव श्रेष्ठ ठरतो, निदान ब्रह्माच्या खालचा म्हणजे दुसरा तरी ठरतो. उपसंहार प्यारे ६८, ४९ व ५७ पहा.

यमाचें मोठें कार्य म्हणजे जीवाला आत्मज्ञान करून देणें हेंच होय.

वल्ली १, श्लोक ६

अनुपश्य यथापूर्वे प्रतिपश्य यथापरे ।
सस्यमिवमर्त्यः पच्यते सस्यमिवाजायते पुनः ॥६॥

अर्थ—पूर्वीचे लोक [पूर्वे] कसे मरण पावले आणि पुढचेही लोक [परे] कसे मरण पावतील तें पहा. (त्याचा विचार कर). सस्याप्रमाणेच मरणधर्मी [मर्त्यः] मनुष्य मरतो [पच्यते] आणि सस्याप्रमाणेच पुनः उत्पन्न होतो. म्हणून हे मुला, भिऊं नकोस हा भाव.

टिप्पणें—हा श्लोक कोणी कोणास म्हटला हें निश्चितपणें समजत नाही. हा मुलाने बापास म्हटला असेल किंवा बापानेही मुलास म्हटला असेल. बाप माझें मृत्यूला दान करणार व त्यामुळे मी मरणार असें भय मुलास वाटलें असें समजून तें भय नाहीसें करण्याकरिता बापाने मुलास हा श्लोक म्हटला हेंच मला जास्त संभाव्य वाटतें व त्याप्रमाणे मी अर्थ केला आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

परोक्षवादविवरणांतही जीव झोपीं गेला तरी पुनः जागा होतोच तेव्हा झोपीं जाण्यापासून भय कोणतेंच नाही असा भाव.

वल्ली १, श्लोक ७—८

वैश्वानरः प्रविशत्यतिथिर्ब्राह्मणो गृहान् ।
तस्यैतां शांतिं कुर्वंति हर वैवस्वतोदकम् ॥७॥

आशाप्रतीक्षे संगतं सूनृतां च ।
इष्टापूर्ते पुत्रपशूंश्च सर्वान् ॥
एतद्वंक्ते पुरुषस्याल्पमेधसो
यस्यानश्नन् वसति ब्राह्मणो गृहे ॥८॥

अर्थः—अग्नीप्रमाणे जाळणारा [वैश्वानरः] हा ब्राह्मण अतिथि, हे यमा, तुझ्या गृहांत आला आहे. त्याची ही अशी शांति करतात, त्याला उदक वगैरे दे. ॥७॥ ज्याच्या घरीं ब्राह्मण उपाशी [अनश्नन्] राहतो, त्या बुद्धिहीन [अल्पमेधसः] मनुष्याच्या आशा, प्रतीक्षा सुसंगतीचें फळ, गोड बोलण्याचें फळ, इष्टापूर्तीचें फळ पुत्र, पशु, ह्या सर्वांचा तो नाश करतो ॥८॥

टिप्पणें:—बापाने यमाला नचिकेताचें दान केलें, तेव्हा नचिकेत यमाच्या घरीं गेला, पण तेव्हा यमच स्वताच्या घरीं नव्हता. त्यामुळे नचिकेत तीन रात्रीं उपाशी राहिला. यम परत आल्यावर त्याच्या मंत्र्याने वरील श्लोक यमास म्हटले, अशी हकीकत अध्याहृत मानावी लागते.

आशाप्रतीक्षेः—श्री शंकराचार्य ह्याचें विवरण असें करतात. "अनिर्ज्ञातप्राप्येष्टार्थप्रार्थना आशा निर्ज्ञातप्राप्यार्थप्रतीक्षणं प्रतीक्षा ते आशाप्रतीक्षे।"

वल्ली १, श्लोक ९

तिस्रो रात्रीर्यदवात्सीत् गृहे मेऽ ।
-नश्नन् ब्रह्मन्नतिथिर्नमस्यः ॥
नमस्तेऽस्तु ब्रह्मन् स्वस्ति मेऽस्तु ।
तस्मात्प्रति त्रीन् वरान् वृणीष्व ॥९॥

अर्थ—हे ब्राह्मणा, [ब्रह्मन्] ज्याअर्थी [यद्] नमस्कार करण्यास योग्य असा अतिथि तूं असून माझ्या घरीं तीन रात्रीं उपाशी [अनश्नन्] राहिलास, त्या अर्थी तुला नमस्कार असो. आणि माझें कल्याण व्हावें म्हणून [तस्मात्] तूं मला उपाशाच्या एका रात्रीला एक वर ह्याप्रमाणें [प्रति] तीन वर माग. ॥९॥

टिप्पणें—परोक्षवादविवरणांत, उपास म्हणजे कोणत्याच विषयाचा उपभोग न घेणें. असें झोपेंत होतेंच. ह्या श्लोकांत यमाचें भाषण आहे.

वल्ली १ श्लोक १०–११

शांतसंकल्पः सुमना यथा स्यात् ।
वीतमन्युर्गौतमोमाभिमृत्यो ॥
त्वत्प्रसृष्टं माभिवदेत्प्रतीतः ।
एतत्त्रयाणां प्रथमं वरं वृणे ॥१०॥

यथा पुरस्तात् भविता प्रतीतः ।
औद्दालकिर् आरुणिर्मत्प्रसृष्टः ॥
सुखं रात्रीः शयिता वीतमन्युः ।
त्वां ददृशिवान् मृत्युमुखात्प्रमुक्तम् ॥११॥

अर्थ—(नचिकेत म्हणाला) "हे मृत्यो, माझा पिता गौतम माझ्यासंबधाने [माभि—मा अभि] शांतचित्त [शांतसंकल्प] प्रसन्नहृदय [सुमनाः] आणि क्रोधरहित [वीतमन्युः] होवो आणि त्वां मला सोडल्यानंतर मी जेव्हा बापाकडे परत जाईन तेव्हा मला [त्वत्प्रसृष्टम्] हा माझा पुत्र नचिकेतच होय असें ओळखून [प्रतीतः] तो माझ्याशीं बोलो. तीन वरांपैकी हाच पहिला वर मी तुला मागतों." ॥१०॥ ह्यावर यम म्हणाला, 'तुझा बाप औद्दालकि आरुणि तुला ओळखून [प्रतीतः] तुझ्याशीं पूर्वीसारखाच [यथा पुरस्तात्] होईल म्हणजे वागेल. आणि क्रोधरहित होऊन [वीतमन्युः] 'हा मी यमास देऊन टाकलेला [मत्प्रसृष्टः] माझा पुत्र तीन रात्रीं केवळ सुखाने निजला [शयिता] होता [अभूत्-अध्याहृत], असें [इति-अध्याहृत] मृत्यूच्या मुखांतून सुटलेल्या तुला पाहील म्हणजे मानेल. ॥११॥

टिप्पणें—औद्दालकिः आरुणिः-अरुणि, उद्दालक आणि श्वेतकेतु ह्यांचा निर्देश छांदोग्य ३।११।४;

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

६।१।१; ६।८।१; ५।३।१; ५।११; ११२ आणि बृहदारण्यक ६।२।१, ६।५।३ येथें आला आहे. आणि येथेंहि कठांत आहे. गौतमाचा निर्देश येथे व छांदोग्य ५।३ येथेहि आहे. त्यांवरून पुढील वंशावळी ठरते.

गौतम
|
अरुणि (पुत्र)
|
उद्दालक (पुत्र व शिष्य)
|
श्वेतकेतु (पुत्र व शिष्य) याज्ञवल्क्य (शिष्य)

"नचिकेत" हें श्वेतकेतूचें दुसरें नांव असेल किंवा तो उद्दालकाचा दुसरा पुत्र असेल.

"उद्दालक एव औद्दालकिः" असें विवरण श्री शंकराचार्यांनी केलें आहे. तेंच आम्ही मान्य केलें आहे.

"मत्प्रसृष्टः सुखं रात्रीः शयिता" हें यमाचें वाक्य समजून श्री शंकराचार्यांनी अर्थ केला आहे. मीं तें उद्दालकाचें वाक्य मानून अर्थ केला आहे व तो अर्थ करतांना "शयिता" हें लुटाचें रूप न मानतां तृप्रत्ययांत कर्तृवाचक रूप मानलें आहे. ह्या माझ्या अर्थामध्ये "प्रसृष्टः" ह्याचा अर्थ "त्वत्प्रसृष्टः" आणि "मत्प्रसृष्टः" ह्या दोनही ठिकाणीं सारखाच करतां येतो. श्री शंकराचार्यांच्या अर्थामध्ये "प्रसृष्ट" ह्याचे दोन ठिकाणीं दोन भिन्न अर्थ करावे लागतात. शिवाय माझा अर्थ संदर्भाशीं अधिक चांगला जुळतो. कारण 'माझ्या बापाने पुढील काळांत सुखाने निजावें' हा वरच नचिकेताने मागितला नव्हता.

गौतम—येथे गौतमाचा मुलगा उद्दालक असा अर्थ आहे. परोक्षवादविवरणांत पुष्कळ गाई म्हणजे इंद्रियें ज्याला आहेत असा प्राण किंवा ब्रह्म.

वल्ली १, श्लोक १२-१३:—

स्वर्गे लोके न भयं किं च नास्ति ।
न तत्र त्वं न जरया बिभेति ॥
उभे तीर्त्वा शनायापिपासे ।
शोकातिगोमोदते स्वर्गलोके ॥१२॥

स त्वग्निं स्वर्ग्यमध्येषि मृत्यो ।
प्रब्रूहि तं श्रद्दधानाय मह्यम् ॥
स्वर्गलोका अमृतत्वं भजंते ।
एतद्द्वितीयेन वृणे वरेण ॥१३॥

अर्थ—नचिकेत म्हणाला, "स्वर्गलोकांत म्हणजे शारीरिक सुस्थितीच्या अवस्थेंत, कोणतेंच भय नाही, तेथे मृत्यु (त्वं) नाही आणि (जरा असली तरी) तिचें भय वाटत नाही. तेथे भूक आणि तहान ह्या दोनहि तरून जातो म्हणजे भूक तहान लागली असतां त्या तृप्त करण्यास अन्न आणि पाणी मिळतेंच; त्यामुळे भूक तहानेने होणारा मृत्यू त्या अवस्थेंत नाही आणि जरा आली तरी तिचेंहि भय वाटत नाही. म्हणून स्वर्गलोकांत मनुष्य शोकाला जिंकून [शोकातिगः] आनंदांत असतो. ॥१२॥ हे मृत्यो, त्या शारीरिक सुस्थितीच्या अवस्थेस प्राप्त करून देणारा [स्वर्ग्य] जो अग्नि आहे त्याचें त्वां विचार करून ज्ञान करून घेतलें आहेस [अध्येषि] तर तुझ्यावर श्रद्धा ठेवणारा जो मी त्या मला तो सांग ॥ कारण स्वर्गांतील लोकांनाच अमृतत्वाची म्हणजे आत्यंतिक आनंदाची म्हणजे ब्रह्मानंदाची प्राप्ती होते [भजंते]. हेंच मी दुसऱ्या वराने मागतों. ॥१३॥

टिप्पणें—स्वर्गलोक–लोक म्हणजे अवस्था हें केनांत १–२ येथे दाखविलेंच आहे. स्वर्ग म्हणजे ब्रह्मानंदाची अवस्था असा अर्थ केनांत ४–९ येथे आहे असें तेथे दाखविलें आहे पण येथे शारीरिक सुस्थिति असा गौण अर्थ घ्यावा लागतो. कारण "स्वर्गलोका अमृततत्वं भजंते" ह्या वाक्यांत स्वर्ग आणि अमृतत्वं म्हणजे ब्रह्मानंदावस्था ह्या दोन भिन्न मानल्या आहेत. शारीरिक सुस्थिती तरी सामाजिक सुस्थितीशिवाय संभवत नाही म्हणून स्वर्गलोक म्हणजे सामाजिक सुस्थितीची अवस्था असाही अर्थ करतां येतो. "अमृतत्व" म्हणजे आत्यंतिक आनंदाची अवस्था, ब्रह्मावस्था किंवा ब्रह्मलोक हें आता स्पष्टच आहे "अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते" ह्या ईशांतील वचनांत जें सांगितलें आहे तेंच येथे तेराव्या श्लोकांत सांगितलें आहे. पुढील "मृत्यु" वरील टिप्पण पहा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वल्ली १, श्लोक १४–१९

प्र ते ब्रवीमि तदु मे निबोध ।
स्वर्ग्यमग्निं नचिकेतः प्रजानन् ॥
अनंतलोकाप्तिमथो प्रतिष्ठाम् ।
विद्धि त्वमेतन्निहितं गुहायाम् ॥१४॥
लोकादिमग्निं तमुवाच तस्मै ।
या इष्टका यावतीर्वा यथा वा ॥
स चापि तत्प्रत्यवद् यथोक्तम् ।
अथास्य मृत्युः पुनरेवाह तुष्टः ॥१५॥
तमब्रवीत्प्रीयमाणो महात्मा ।
वरं तवेहाद्य ददामि भूयः ॥
तवैव नाम्ना भवितायमग्निः ।
सृंकां चेमामनेकरूपां गृहाण ॥१६॥
त्रिणाचिकेतस्त्रिभिरेत्य संधिम् ।
त्रिकर्मकृत् तरति जन्ममृत्यू ॥
ब्रह्मजज्ञं देवमीड्यं विदित्वा ।
निचाय्येमां शांतिमत्यंतमेति ॥१७॥
त्रिनाचिकेतस्त्रयमेतद्विदित्वा ।
य एवं विद्वाँश्चिनुते नाचिकेतम् ॥
स मृत्युपाशान् पुरतः प्रणोद्य ।
शोकातिगो मोदते स्वर्गलोके ॥१८॥
एष तेऽग्निर्नचिकेतः स्वर्ग्यो ।
यमवृणीथाः द्वितीयेन वरेण ॥
एतमग्निं तवैव प्रवक्ष्यंति जनासः ।
तृतीयं वरं नचिकेतो वृणीष्व ॥१९॥

अर्थः—यम म्हणाला, "हे नचिकेता, स्वर्ग्य अग्नि जाणणारा मी तुला तो अग्नि सांगतों, ऐकून घे.॥ अनंत लोकाची म्हणजे ब्रह्मलोकाची प्राप्ति करून देणारा व प्राप्त झालेल्या त्या ब्रह्मलोकाला स्थिर ठेवणारा [प्रतिष्ठा] तो अग्नि गुहेंत म्हणजे आत्म्याच्या अंतरांतच ठेवलेला आहे हें जाणून घे." ॥१४॥ नंतर यमाने त्याला जगाची उत्पत्ति करणारा [लोकादिम्] तो अग्नि सांगितला. त्याच्या विटा [इष्टकाः] कोणत्या, किती व कशा आहेत तें यमाने सांगितलें. ॥ आणि नंतर यमाने जें सांगितलें होतें तें नचिकेताने म्हणून दाखविलें [प्रत्यवदत्] तेव्हा यम संतुष्ट होऊन नचिकेतास पुनः म्हणाला. ॥१५॥ तो महात्मा यम नचिकेतास प्रीतिपूर्वक [प्रीयमाणः] म्हणाला, "हा पुनः दुसरा वर मी तुला देतों. तो हा--हा अग्नि पुढे तुझ्या नांवनेच प्रसिद्ध होईल [भविता]. अनेक रूपांची ही माळा [सृंकाम्] ही तूं घे. ॥१६॥ तीन नाचिकेतनामक अग्नींची उपासना करणारा [त्रिणाचिकेतः] व तीन प्रकारचीं कर्में करणारा [त्रिकर्मकृत्] तीन गोष्टींशीं संधि पावून म्हणजे तीन गोष्टी मिळवून ह्या आयुष्यांतील दोन प्रकारचे मृत्यू [जन्ममृत्यू] तरून जातो म्हणजे टाळतो. ॥ ब्रह्मापासून झालेल्या व विद्वान् [ब्रह्मजज्ञम्] अशा देवाला म्हणजेच अग्नीला जाणून म्हणजेच त्याची उपासना करून, ही माळा [इमां सृंकाम्] गोळा करून [निचाय्य] म्हणजेच मिळवून तो अत्यंत शांतीला म्हणजे दुःखरहित स्थितीला प्राप्त होतो. ॥१७॥ जो तीन नाचिकेत अग्नींची उपासना करणारा [त्रिणाचिकेतः] हीं तीन कर्में [त्रयम् एतत्] जाणून घेऊन, त्यांनी त्या नाचिकेताग्नीची उपासना करतो [चिनुते] तो मृत्युपाशाला पुढेपुढे ढकलून [पुरतः प्रणोद्य] म्हणजे दीर्घ आयुष्य मिळवून दुःखाच्या पलीकडे जाऊन [शोकातिगः] स्वर्गलोकांत आनंदाचा अनुभव घेतो [मोदते]. ॥१८॥ हे नचिकेता, त्वां दुसऱ्या वराने मागितलेला, स्वर्ग प्राप्त करून देणारा हा अग्नि मी तुला सांगितला आहे. ह्या अग्नीला लोक [जनासः] "हा तुझाच अग्नि होय असें म्हणतील. आता तिसरा वर तूं माग." ॥१९॥

टिप्पणें—"अग्निः"–हा अग्नि धनधान्यादि देणारी कर्मरूपी देवता होय म्हणजे कर्मच होय. ईशोनिषद् श्लोक १८ येथेहि हाच अर्थ आहे. अशनाया पिपासा ह्यांना म्हणजे भूक तहान ह्यांना कर्मेंच जिंकू शकतात म्हणून हा स्वर्ग प्राप्त करून देणारा अग्नि कर्मेंच होय हें निश्चितपणें ठरतें आणि स्वर्गलोक म्हणजे शारीरिक सुस्थिति हेंहि ठरतें.

"मृत्युः"–"मृत्यु" ह्याचा अर्थ जीविताचा अंत असा प्रसिद्धच आहे. केव्हा केव्हा 'मृत्यु'चा अर्थ दुःख

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असाहि होतो हें उपसंहार प्यारा २८ येथें दाखविलें आहे. वरील कांही श्लोकांमध्ये त्याचा अर्थ "जीवितान्त" असाच आहे. पण जीवितान्तही तीन प्रकारचा आहे. (१) भूक तहानेने होणारा, (२) रोगांनी होणारा आणि (३) केवळ वार्धक्याने होणारा. ह्या तीन प्रकारांपैकी वार्धक्याने होणारा जीविताचा अंत कशानेच टळत नाही. पण भूकतहानेने. व रोगाने होणारा जीविताचा अंत कर्मांनी टळतो. ह्यालाच दररोजचा मृत्यु किंवा अकाल मृत्यु किंवा आयुष्यांतील मृत्यु, म्हणतां येतें. बृहदारण्यक १-५-२ येथे ह्यालाच "पुनर्मृत्यु" असें म्हटलें आहे. पंधराव्या श्लोकांत "न तत्रत्वम्" ह्या शब्दांनी हेंच सांगितलें आहे की तेथे "अकाल मृत्यु" (जीवितान्त) नाही. श्लोक सतरावा येथे "जन्ममृत्यू" ह्याचा अर्थहि जन्मांतील म्हणजे आयुष्यांतील हे दोन अकाल मृत्यू असा आहे. "जन्म" म्हणजे आयुष्य असाहि अर्थ होतोच. (आपट्यांचा कोश) पहा. मनुस्मृति ९-१०० आणि ५-३८ आणि भगवद्गीता ४-५ येथे "जन्म" ह्याचा "आयुष्य" (life) असाच अर्थ आहे.

त्रिकर्मकृत्:—तीन प्रकारचीं कर्मे कोणतीं ह्याचा उलगडा बृहदारण्यक ३-१-७ येथील वचनाच्या सहाय्याने होतो. तेथे अग्नीच्या तीन ऋचा सांगितल्या आहेत व त्यांनी सर्व "प्राणभृत्" म्हणजे प्राण धारण करणारे मिळवितो असें म्हटलें आहे. त्यावरून प्राणधारणास आवश्यक अशा वस्तूंचे तीन वर्ग केले आहेत असें दिसतें. ते अन्न, वस्त्र आणि घर हे होत. ह्यांनीच खरोखर "तरति जन्ममृत्यू" या वचनांत सांगितलेल्या फळाची उपपत्ति लागते. (औषधि व पाणी यांचा अन्नांमध्येच अंतर्भाव केला आहे हें लक्षांत ठेवावें.) अर्थात् त्रिकर्मकृत म्हणजे अन्न, वस्त्र आणि घर यांस प्राप्त करून देणारीं कर्मे करणारा असा अर्थ होतो. "त्रिभिरेत्य संधिम्" म्हणजे "अन्न, वस्त्र आणि घर मिळवून" असा अर्थ होतो. "त्रिणाचिकेत" यांतील तीन नाचिकेत अग्नि म्हणजे अन्न, वस्त्र आणि घर प्राप्त करून देणारीं कर्मे असा अर्थ होतो.

सृंकाः—म्हणजे परोक्षवादविवरणांत विषयोपभोगपरंपरा असा अर्थ केला पाहिजे. वल्ली २ श्लोक ३ येथे हा शब्द आला आहे. तेथेहि हाच अर्थ जुळतो. अल्प विषयोपभोगाशिवाय शरीराची व समाजाचीहि सुस्थिति असूं शकत नाही हें लक्षांत ठेवावें.

"मृत्युपाशान् पुरतः प्रणोद्य"—"आजचा मृत्यु उद्यावर ढकलून" असा याचा खरा अर्थ आहे, व शब्दशः तसा अर्थ होतोच. मृत्यु अजिबात टाळून मरणरहित कोणीच होऊं शकत नाही. फक्त जीविताचा काळ योग्य आचरणाने वाढवूं शकतो, त्याशीं हें वचन जुळतें. ईशोपनिषद् श्लोक ११ यावरील टिप्पणांमध्ये "अविद्यया मृत्युं तीर्त्वा" यावरील टिप्पण पहा.

"अनंत लोकाप्तिमथोप्रतिष्ठां"—केनोपनिषदांतील शेवटच्या वाक्यांत स्वर्गलोकाला म्हणजेच ब्रह्मलोकाला अनंत हें विशेषण लाविलें आहे हें लक्षांत ठेवावें. त्यावरून अनंत लोक म्हणजे ब्रह्मलोक असें ठरतें. "प्रतिष्ठा" ह्या वर्णनावरून ब्रह्मलोक अग्नीवर म्हणजेच कर्मावर प्रतिष्ठित आहे म्हणजे मनुष्य कर्मे करीत राहील तोंपर्यंतच ब्रह्मलोक म्हणजे अत्यानंदावस्था राहूं शकते हा अर्थ स्पष्टच आहे, व केवळ ज्ञानाने ब्रह्मलोक मिळतो म्हणणाऱ्यांनी लक्षांत ठेवावा. उपसंहार प्यारा ४० अ पहा.

"विद्धित्वमेतन्निहितं गुहायां"—कर्म करण्याची प्रवृत्ति जीवाच्या अंतरांतच आहे म्हणून असें म्हटलें आहे. "न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्" हें भगवद्गीतेचें वचनहि हेंच सांगतें.

"लोकादिमग्निम्":—जगाची उत्पत्ति तरी ब्रह्माच्या कर्मापासूनच होते म्हणून कर्मांना "लोकादि" म्हटलें आहे.

"इष्टकाः"—हा परोक्षवाद आहे हें उघडच आहे. ह्याचें विवरण काय हा प्रश्न आहे. कर्मे योग्य रीतीने करण्यास जरूर त्या गोष्टी ह्यांसच येथे इष्टका म्हटलें आहे हें उघड आहे. त्या गोष्टी, सुदृढ शरीर, यथार्थज्ञान, आणि इंद्रियवश्यता ह्या होत हें पुढे वल्ली ३ श्लोक ३-६ ह्यांवरूनहि दिसून येतें.

"ब्रह्मजज्ञम्" कर्म हें ब्रह्मापासून उत्पन्न झालें हें उघडच आहे. आणि कर्मे योग्य रीतीने करण्यास ज्ञानहि पाहिजेच म्हणून कर्मरूपी अग्नीस "ब्रह्मजज्ञ" हें विशेषण लाविलें आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

एकूण श्लोक १२ ते १९ ह्यांचें सार हेंच आहे की चांगलीं कर्में करून भूकतहान शांत करून शरीराची सुस्थिति साध्य करून, ती कायम ठेवावी. हेंच "अविद्यया मृत्युं तीर्त्वा" ह्या ईशोपनिषदांतील वचनांत सांगितलें आहे.

वल्ली १ श्लोक १२-१९ येथे प्रथम कर्मरूपी अग्नीची उपासना सांगून नंतर आत्मज्ञान सांगितलें. ह्यावरून ह्या उपनिषदांतहि कर्मांची व ज्ञानाची सांगडच (ज्ञानकर्मसमुच्चयच) प्रतिपादिली आहे हें उघड आहे. कठ ६।१२-१३ येथे ब्रह्मानुभव जागृतिशिवाय होऊं शकत नाही असें सांगितलें आहे. जागृति, शरीर जिवंत असल्याशिवाय असूं शकत नाही, आणि शरीर जिवंत असणें कर्मांशिवाय घडत नाही म्हणून कर्म आवश्यकच ठरतें.

दृष्टिभेट—

(अष्टाक्षरी छंद)

तुझी माझी दृष्टभेट
अचानक होते जेव्हां
उदात्त उठे भावना
अंतरांत मम तेव्हां १

क्षणामध्ये दृष्टिआड
मग होतेस ग माझ्या
काय भाव न उमजे
अंतरांत मज तुझ्या २

स्नेहांकित दृष्टि तुझी
जागवी मम भावना
ओढ लागे जाणण्याची
मग तव सद्भावना ३

उंच काळी मूर्ति तुझी
अति लावण्यहि नाही
परि आहे इष्ट कांही
जे न सुंदरींत पाही ४

दुष्ट वृत्तीच्या दुष्टांच्या
दुष्ट पापी नजरांना
निष्पाप नयन तुझे
लाजवतील तयांना ५

मधुर तें भाष्य तुझें
ज्यांत उन्मत्तता नाही
आणि अश्लिलपणाचा
ज्यांत लवलेश नाही ६

छंद नाही मुळी तुज
सज-धज शृंगाराचा
कोण म्हणेल गुण हा
नाही तुझा गौरवाचा ७

प्रसन्न तव वदन
तें निर्मल तव मन
खऱ्या निष्पापपणाची
हीच आहे बरे खूण ! ८

सत्याचीहि तुज चाड
नीति तुझा सर्वाधार
खोटाडे कापति सारे
तुजपुढे थरथर ९

तुझा केशकलाप तो
आहे परि साधारण
काय असे तुज वाटे
लावण्याची हीच वाण ? १०

लावण्य तुझें तेंच जें
'चारित्र्य' आहे अमोल
सुंदरींच्या लावण्याला
तयापुढे काय मोल ११

तुझी माझी दृष्टभेट
होते सदा जेव्हां जेव्हां
सद्भावना मम साऱ्या
उद्भवति तेव्हां तेव्हां १२

तुझी माझी दृष्टभेट
होते अचानक जेव्हां
उदात्त उठे भावना
अंतरांत मम तेव्हां १३

—दत्तात्रय चौधरी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें

काळु घराण्यांतील कागदपत्रें

संशोधक : शंकर गोविंद चट्टे, एम्. ए., शास्त्री

आप्पासाहेबाचा अहवाल

(प्रस्तुत अहवाल भोसल्याचे दिवाण काळु यांचे वंशज त्रिंबकराव ऊर्फ बाबासाहेब यांच्या संग्रहांत सापडला. प्रस्तुत अहवालावर मी सन १९३५ च्या मध्यप्रांत संशोधन मंडळाच्या सभेंत एक निबंध वाचला होता.)

सुरत अहवाल श्रीमंत महाराज राजेश्री आपासाहेब बहादूर नविस्ता सन १२४०

इलाके मुलुक चितोडगड व उदेपूर व सातारा वगैरे येथील मालिक आज इप्तताह कोम रजपुतानाईत सिसोदिये होत आले. जे वेळेस बादशहा गाजी हिंदुस्तानांतून बतरिक सयेर मुलुकगिरीच्या रोनक अफरोज बलकाज्या दाटीस झाले ते वेळेस चितोडगडचे राजाशी जंग मुकरर करून फौज बादशाही किल्ल्याचे मोर्चेबंदीकरिता कायम केली व लढाई करत‥‥‥जमियत रजपुताकडील बहुत कामास आली. बादशहांनी किल्ला हस्तगत केल्यानंतर कुलफौज तेथे ठेवून आपण आपली ‥‥इराद्याने दक्षिण देशांत घेऊन गेले. बाद कांही एक दिवस महाराजकुंवर विक्रमसिंग बिरादर राजांनी बादशहा निजामुद्दीन गाजी याचे मुलाजमतीत जाण्याकरिता यांनीहि तिकडेंसच कूच केलें. हा अखबार हुजूरचे गोशगुजार होताच बगायत खुष होऊन त्यास आपलेजवळ बोलावून निहायेत तसलीन उमदा खिलअत व तोच मुलुक फतह केलेला जागीर देऊन बावनहजारी मनसब बाफजंदान इनायत केली. तेव्हा कुवरजी मवसुफांनी अर्ज करून उदेपूर वगैरेहून मुलुक आपले भावासही देवविला. तो हन्नोज त्याचे अवलादीचे येकतियाचे इकडे कुवरजी मशारनिल्हे सीताबहयात स्वकीय राज्यांत गालीव होऊन आपले समक्षच राजे रामाजी यास राजकीय कृत्यांत दक्ष‥‥गादीनशीन केल्यावर आपण या अविश्वास जगाचा परित्याग (करून) स्वर्लोकी गमन केलें नंतर कांही एक दिवसानी राजे रामाजी परणने सिदखेड येथील गांव मौजे भोस पसंद करून तेथे राहण्यास जाय मुकरर केली. सबब भोसले लकब मशूर जाला. त्यानीहि आपले पुत्र बाबाजी नामे यास राज्यासनी बसवून आपणहि पितृलोकीं प्रयाण केलें. बाबाजी मशारनिल्हे यास दोन पुत्र होते. एकाचें नांव विठोजी व दुसरा मालोजी. या उभयताच्या वाटण्या तीर्थरुपासमक्ष होऊन विठोजीस वऱ्हाड व मालोजीस सातारा ऐसे दोन मुलुख दोघास दिले. त्यास मालोजीस दोन पुत्र. संभाजी व स्वरूपजी

मालोजी निवंतल्यावर संभाजी अधिकारी झाले त्यानंतर त्यांचेच पुत्र शिवाजी यांनी राज्य केलें. त्याहापासून संभाजी झाल्यावर त्याहासहि दोन पुत्र. नामे शाहू व दुसरा प्रता (पसिंह). उभयता तीर्थरुपलयास पावल्यावर रियासतचे कामात (स्वरु)पजीचे पुत्र राजे बिजेराम मसनदशीन झाले परंतु त्याचे मनांत सौदा उत्पन्न जाला. त्यामुळे राजेश्री बाळाजी बाजीराव नानासाहेब पेशवे पुणेवाले यांनी जुने सरदार व मुसाहेब लोकांचे इतफाकानी फितुर करोन हुजुरचे हुकमांत रखणा आणोन जाहीर केले जे मोठे महाराजांनी मुलुक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आमचे स्वाधीन केला. मुख्य पराधीन वृत्तीचे. तेव्हा ऐसे फंदानी चंदरोज पेशा मुखत्यारीचा एखत्यार करून तव इतकियांत अकस्मात राजा होशात येऊन फितना वरपा पाहिला. मग सावधपणें शोध करणें सुरू करून या फरेबाची जड मनास आणली. ते काळीं दामाजी गाइकवाड सेनापती याजला विश्वासुक जाणोन आज्ञा निरोपिली की, ऐसा नमकहरामीचा नक्षा उत्पन्न करणार······वा याजला शिक्षा लावून या तुफानास फना करावे. हे उभयता त्या सलहेत म्हणून ही गोष्ट हक्क न जाणता नानासाहेवास स्पष्ट सांगोन अविचार ऐसा केला तो राजाच विषद्वारा परलोकास पाठविला. तो अपुत्रक आणि गादीला मालक पाहिजे म्हणून त्याच वंशांतील रिस्त्यानी बिजेरामजीचे आजे राजेरामजी याजला निमित्तमात्र राज्यासन देऊन वंदोवस्त होता तैसा चालविला. यांनी अल्प दिवसांतच सात जोरावरीच्या कोणास न मानता हुकूम जारी करू लागला. हे मसलहत पुढे भारी पडेल ऐसे जाणून याजलाहि तैसेच विषयोगें हक्क केल्याउपरांतिक त्याच घराण्यांतील शिवाजी नामे याजला अधिकारसंपन्न केले. त्यास तिघे पुत्र. अव्वल शाहू व आपा व आवासाहेव. सारांश अद्याप तेथे वंश कायम आहे.

माता विठोजीस दोन पुत्र. घवळोजी व बिंबाजी. त्यांत घवळोजी लाअवलाद मेले. सबब राजे बिंबाजीच मालक झाले. त्याहापासून त्रिंबकजी मुधोजी नारायणजी व बापूजी ऐसे परंपरा चार पुरुषांनी राज्य केले. त्यामध्ये बापुजीस तीन पुत्र परसोजी साबाजी व मुधोजी यांत ज्येष्ठ परसोजीनी रियासत केली त्याचेच पुत्र कान्होजी व त्याचे पुत्र रायाजी यांनी एकामागें दौलत करून रायाजी व साबाजी लाअवलाद म्हणोन मुधोजीचे पुत्र बिंबाजी यांनी मालकी केली. बाद त्याचे पुत्र रघोजी कायम झाले. त्यास चार पुत्र. जानोजी, मुधोजी, बिंबाजी व साबाजी. यांत कदिमकायदेमवुजब जानोजी गादीनशीन झाले असतां ते लाअवलाद मेल्यावर मुधोजी दखल पावले. राहिले साबाजी व बिंबाजी. तेहि तैसेच लाअवलाद. त्यास मुधोजी महाराजापासून सरकार कुंपनीचे दोस्तीचा रिस्ता सुरू झाला. याचा सबब जरनेल गाडरसाहेब व पंडत प्रधान पेशवे पुणेवाले यांसी जंग झाला तेव्हा जरनेलसाहेब शिकस्त पावून मैकंपु फरार होऊन बेकरार जंगलोजंगल हैराण अफतरपरेशान फिरत होते. वाट न मिळे. सबब मार्फत वकील··· बयाण मैकंपु महाराजसाहेबांनी रस्ता दिला तेव्हाच······करार दोस्तीचे चालविण्याविषयी उस्तवार झाल्यानंतर या वर्तमानास पेशवे खबर होऊन महाराज मौसुफास हुकूम केला की तुम्ही अंग्रेजाशीं लढावे अगर त्यांची दोस्ती मंजूर असल्यास आमशीच कमरबंद व्हावे. ते काळीं पंतप्रधान जोरावर जाणोन लाट अष्टमन साहेबाचे सलेनीच सरकार कुंपणीशी कसद फिर्यादीचा केला. ते समयी व विकालत अंडरसन साहेबबहादूर व वेणिराम पंडत सलह होऊन बदस्तुर दोस्ती कायम राहिली. बाज महाराज मवसुफास चौघे पुत्र. अव्वल रघोजी, दुय्यम खंडोजी उर्फ चिमणाबापु, सुयम व्यंकोजी, चहारम लक्ष्मणजी. ते शिरखुर्दपणातच मेले. राहिले तिघे.त्यांत महाराजसाहेबानंतर राजे रघोजी कारमुखत्यार झाले. ह्या अमलांत पहिल्याने सरकार कुंपनीचे तर्फेने रेवीसाहेब व फरस्तरसाहेब विकालतीचे पेशजीने तेथे राहिले त्याचेबाद कलवुर्ग साहेब त्याच कामी मुस्तकीम झाले तेव्हा या सरकारांतूनहि विश्वंभरपंत कुंपनी सरकारांत कायम केले तोपर्यंत शिलशिला मोहबतीचा मजबूतच राहिला. बाद चंद मुदत विश्वंभरपंताची बदली करून वगाजी रघुनाथ यासी विकालत दिली. तेथे राव दौलतराव शिंदे अलिजा बहादूर याचे तरगिबीने लाट फारेस्टिन साहेबाचे अंमलांत उभयता सरकारचे दरम्यान वलजली साहेबाशीं जंग झाला तो राजे मनसुफाचे नफ्तह होऊन अलपिस्तिन साहेब व यशवंतराव रामचंद्र याचे वकिलीत श्री जगन्नाथ व कटक व सुभे वराड व वगेसा (?) कंपनी सरकारांत देऊन अनुसरण व दोस्ती सुरू झाली. ते लाट बारलो साहेबाचे अंमलांत इकडोन बाळाजी अनंत संगम याचे इस्तसबाब बराबरच राहिली. जे काळीं लाट साहेब गाजीपूर यमुनेत मयत झाले व लाट बारलो त्या कामावर आले तेव्हापासून जंकिन साहेब आमचे सरकारांत दखल पावले. नंतर लाट मिंटो साहेब बहादूर याचे वेळेस मीरखान मुफसद या सरकारचे मुलखांत दंगा करू लागला. ह्या हंगामांत कर्नेल कुटुससाहेब त्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सरकारचे तर्फेने मुखालिफाचे पारपत्यानिमित्त येऊन एकदिली कुचंदा दाखविली. असो. महाराज मनसुफ वेहस्तनशीन झाल्याबाद त्याहाचे साहेबजादे वइस्म राजे परसोजी भोसले मसनदनशीन झाले. जेव्हा लाअवलाद जिनगी दिनदुनिया तरीक केली आणि चिमणाबापूचीहि मौत तशीच जाली. सबब महाराज व्यंकोजी भोसले याचे पुत्र मुधोजी याने मीच मसनदीस इनत बक्षिली. तावत गुजरलेला अहवाल फियावैन तव''''''उदचा ऐन साआदत खियालत आणून कुंपनी अंग्रेज बहादूर बुजरग समजोन लाट वोरा साहेबाचे अंमलांत कार (भार) वकील मस्तुर बदस्तुर कदीम रावता दोस्तीचा व वास्ता मोहबतीचा बेशतर जारी ठेविला. ऐसे असता परस्परें एक तह मुकरर करण्यांत आला.

वि. त. ल. अव्वल–साडे सात लाख रुपये सालियाना कुंपनी सरकारात देऊन चार पलटणे आपल्याजवळ चाकर ठेवावी. तवशर्त एखत्यारगिरी वहाली. दुय्यम रुपये नगदीचा साला ब साल देत जाऊ. याचे बदले मुलुक किल्ला वगैरे हरगिज न मागावा. सुय्यम जे वेळेस कोणी गनिम आमचे इकडेस येण्याचा कस्त करील त्याचे दफे करण्यास सरकार कुंपनीचे खर्चाची तलब न करता मदतीविषयी देर न करावी. चहारम आमचे मुलुकभऱ्यात अदालत आपली शावीत न व्हावी. पंतुम आमचे हद्दीत गोवघ ज्यायज न ठेवावा. शमशुम–कोणीहि सरकार मकसुहे''जाणोन आमचे· जवळ आल्यास आपलेपासी सोपावा हा अमल इकडो· नहि तसाच घडावा. हफरुम आमचे सोयरे मुत्सद्दी मानकरी सरदार लोकातून कोणीहि पळोन सरकार कुंपनीचे पन्ह्यात आल्यास त्याचा गौर न करता आम्हापासी पाठवावा व आमचे मुलखांत रयेतीस ज्या तदवोरीने नेक मंजूर होय अमल करु त्यांत आडवे न यावे हस्तुम तीन हजार व दोन हजार प्यादे सरकार मकसुहुचे तैनात वाबजूद (?) आमचे मुलकात राहतील. तोपावेतो तनखा याम्ही देऊ. आमचे सरहद्दीतून दूर गेल्यास त्याचा खर्च सरकार कुंपनीकडेस. नहोम. सरकार मवसुफाचे सल्हेखेरिज कोणतेहि नवाब वगैरे दौलतदाराशी मुलाकत करणार नाही. अगर करणेच जरूर होईल तेव्हा सरकार इतल्याने केली जाईल. दहोम ज्या शखसास आपले तर्फेनी वकिलींत मुकरर करून त्याचे त (र्फे)चे वदलीत दखल न करावा. प्र।। शेळघाट झिलपी आमनेर वाजीराव पेशवे पुणेवाले यांनी आमचेपासोन घेतला. तालुके माणिकगड व चार महाल शिरपूर राजूर तांडुर जळगाव शिकंदरजा हैद्राबादवाले यांचे तर्फेने घेऊन आम्हास द्यावा. त्याजपैकी प्र।। शेळघाट दिला बाकी निकमसुफ (ह) ठहरविला. ऐसा कौल करार ठहरुन तहनामा नवीन हरदो सरकारचे इप्तदापासोन नसलन बाद नसलन माहित आला आहे. त्याजवर कांही एक दिवस गुजरल्यानंतर जंकिनसाहेबी अर्ज केला कीं दोन पलटणे देऊन आमचा भाऊ हेंडरी जेंकिनसाहेब याजला चाकर ठेवावे. जे पक्षी वकील सरकार मकसुहचा होता सबब पास खातर त्याची मंजूर होऊन वकील मस्तुराचे भावास बखताव मंजरी आपणापाशी ठेवले. चंदरोज बाद एक फंद ऐसा जाहीर झाला जे गुजाबादादा आमचे तीर्थरुपाचे भाचे यानी फितना–फिसाद आगाज करोन आमचे मारण्याकरिताहि नेउ''चाले. जेव्हा या मुकद्दम्यास वाकिफ जा(ले) तेव्हा बादमुद्दा साबितीच्या मशारनिल्हेस बतरिक नजरबंदीच्या आपले हवेलींत निगाह ठेवले. दुसरे आशवस त्याचे रफिक त्यास कैद केले सबब की या फिसादेपासून हात उटवावेत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रं थ स मा लो च न

सुश्लोकमानस, भाग ३

[सुश्लोकमानस, भाग ३ रा. रचयिता–कॅ. डॉ. रामचंद चितामण श्रीखंडे, एम्. बी. बी. एस्; मूल्य ५ रुपये. पृष्ठसंख्या ४४+१८०. संग्राहक—पं. महादेव-शास्त्री जोशी, श्रीज्ञानराज प्रकाशन, ४२१, शनिवार, पुणें २]

सुश्लोक मानसाच्या १ ल्या व २ ऱ्या भागाचें समालोचन मी अनुक्रमें युगवाणीच्या जुलै १९५२ आणि जुलै १९५३ च्या अंकांत केलें आहे. आज ३ ऱ्या भागाचें समालोचन करण्याचें सौभाग्य प्राप्त झालें आहे. या ३ ऱ्या भागांत सुंदर, लंका व उत्तर या तीन कांडांचा समावेश झाला आहे. आणि या भागाबरोबर डॉ. श्रीखंडे यांनी १९४२ सालीं गोस्वामी श्री तुळसीदासजी यांच्या हिंदी भाषेंतील श्रीरामचरितमानसाच्या मराठी श्लोकानुवादाचें जें सत्कार्य आरंभिलें होतें, त्याची बरोबर एकतपाने म्हणजे १९५४ सालीं समाप्ति होत आहे. आता डॉक्टरांचा मानस श्रीरामचरितमानसावर प्रबंध लिहिण्याचा आहे. तो श्री गुसाईजींच्या कृपाप्रसादाने सिद्धीस जावो अशी प्रभु रामचंद्राच्या चरणीं प्रार्थना आहे.

बालकांड व अयोध्याकांड यांत जशीं असंख्य सौंदर्यस्थळें आहेत तशीं तीं या शेवटच्या तीन कांडांत आढळत नाहीत. तरीपण सीताशोध, लंकादहन, अंगद-शिष्टाई, प्रभुरामचंद्रांचें पुनरागमन आणि भरतभेट अशीं कांही स्थळें मर्मज्ञ व रसज्ञ वाचकांची दृष्टि आपल्यावर रेंगाळत ठेवतील इतकीं मनोज्ञ आणि रसार्द्र आहेत. डॉक्टरांचा श्लोकानुवाद पूर्वीच्या दोन भागां प्रमाणेंच सरस आहे. परंतु या भागाच्या उपसंहारांत डॉक्टरांनी 'पंचशतावधि चौपायांतें जाणुनि सुंदर धरित उरी' असा मूळास धरून जो अनुवाद केला आहे त्यामुळें कळतनकळत एक 'भ्रांतिकृत चमत्कार' उत्पन्न झाला आहे. डॉक्टरांचा अनुवाद समवृत्त नाही. तो श्लोकबद्ध आहे. परंतु मूळ ग्रंथांतील 'चौपायां'चा उल्लेख त्यांनी तसाच कायम ठेवला आहे. पूर्वीच्या दोन भागांचें समालोचन करतांना मीं मूळ ग्रंथांतील पद्यांविषयीं थोडें विवेचन केलें होतें. डॉक्टरांचा संकल्प श्लोकानुवाद करण्याचा होता, आणि म्हणून त्यांनी मूळांतील दोहा, चौपाई, सोरठा, तोमर, हरिगीतिका इत्यादि प्राकृत मात्रिक छंदाचा अवलंब केला नाही हें खरें. परंतु मूळांतील वर्णिकवृत्तांचा त्यांनी तसाच्या तसाच अवलंब करण्यास प्रत्यवाय नव्हता असें मला वाटतें. तो त्यांच्या श्लोकबद्ध संकल्पास धरून झाला असता. मूळांत अशीं वर्णिकवृत्तें पुष्कळच कमी आहेत. परंतु गोस्वामीजींनी अशीं वेचक वृत्तें ज्या स्थळीं योजिलीं आहेत तीं स्थळें त्या वृत्तांच्या भावानुकूलतेमुळें अतिशय रमणीय व स्मरणीय झालीं आहेत. या दृष्टीने डॉक्टरांनीं 'नगस्वरूपिणी' आणि 'तोटक' हीं वृत्तें मूळाप्रमाणेंच ठेविलीं असतीं तर बहार झाली असती. या दृष्टीने उत्तर कांडांतील ५ व्या तरंगाच्या आरंभीं श्रीशंकरांनी श्रीरामाची जी स्तुति गाइली आहे, तिचा अनुवाद शिखरिणींत न करतां मूळच्या तोटक वृत्तांत ठेवला असता तर तो अधिक मधुर झाला असता. इतकेंच काय, पण मूळांतील रचनाहि फारशी बदलण्याचें कारण पडलें नसतें. मूळ रचना तशीच कायम ठेवून मराठी अनुवाद कसा सरस होतो तें पहा.—

(वृत्त—तोटक)

जयराम रमारमणं शमनं
भवताप भयाकुल पाहि जनं
अवधेश रमेश सुरेश विभो
शरणागति याचित पाहि प्रभो

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुणशील कृपा परमायतनं
प्रणमामि निरंतर श्रीरमणं
रघुनंद निकंदन द्वंदघनं
महिपाल विलोकय दीनजनं

श्री तुलसीदासांनी आपल्या 'मानसां'त रामचरित्राचा आधार घेऊन मनुष्यजीवनाचें जितकें विस्तृत व व्यापक समीक्षण केलें आहे तितकें अन्यत्र कोठेहि आढळत नाही. हें समीक्षण करतांना त्यांनी जे आदर्श निर्माण केले आहेत ते सार्वत्रिक व त्रिकालाबाधित आहेत. हे आदर्श निर्माण करतांना त्यांनी समाजनीति व लोकशिक्षण यांकडे दुर्लक्ष केलेलें नाही. त्याचा परिणाम असा झाला आहे की आज साडेचारशें वर्षांनंतरहि त्यांचा रामचरितमानस हा ग्रंथ हिंदुसमाजास मार्गदर्शक म्हणून उपयोगी पडत आहे.

गुंसाईजींचा राम हा मर्यादा पुरुषोत्तम आहे. तो राजकुलोत्पन्न आहे. त्याच्या भोवतालचें वातावरण नागर आहे. त्याच्याकडे बघण्याचा गोस्वामीजींचा दृष्टिकोण दास्यभक्तीचा आहे. त्यामुळे त्यांनीं आपल्या काव्यांत ज्या व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत त्यांची पातळी आदर्शवादानुसार उच्च ठेविली आहे. त्यांच्या चरित्रचित्रणांत कोठेहि उच्छृंखलता नाही. सर्वत्र सूचक संयम आहे. लंकाकांडांतील ५ व्या तरंगांत अंगद व रावण यांचा संवाद आहे. त्यांत अंगद रावणाशीं विनोद करतो. तो मोठा सूक्ष्म व मार्मिक आहे. अंगदाचा पिता वाली आणि रावण यांची पूर्वी एकदा झटापट झालेली असते. त्या झटापटींत वालीने रावणाचा खरपूस समाचार घेतलेला असतो. अंगद अत्यंत सूचकतेने व मोठ्या खुबीने आपल्या भाषणांत या प्रसंगाचा उल्लेख करतो. गोस्वामीजींच्या शब्दांत त्या दोघांचा संवाद असा —

कह दसकंठ, " कवन तैं बंदर ? "
" मैं रघुबीर दूत दसकंधर—
मम जनकहि तोहि रही सिताई
तव हितकारन आयउँ भाई "
" रे कपिपोत बोलु संभारी
मूढ न जानेहि मोहि मुरारी।
कहु निजनाम जनक कर भाई
केहि नातें मानि हो मिताई "
" अंगद नाम वालिकर बेटा ।
तासों कबहुँ भई है भेटा "
अंगद वचन सुनत सकुचाना ।
" रहा बालि बानर मैं जाना "

या संवादाचा डॉ. श्रीखंडेकृत मराठी श्लोकानुवाद असा—

त्यातें दशानन पुसे "कपि कोण ? तूं रे ! "
" मी रामदूत" कपि सांगत "जाण सारे !
माझ्या पित्यासह असे तव मैत्र नातें
त्या साठि मी तव हितास्तव येत येथे "
तेव्हा दशास्य वदला, "कपिबालका रे !
संभाळुनीच कर तूं मज बोल सारे
कैसा असेल तव तात मदीय मित्र ?
सारेंच रे ! कथ मला तुमचें चरित्र."
बोले कपी, " मजसि अंगद नाम जाण
मत्तात वालि, कधि तो तुज भेटला न ? "
तें अंगदोक्त लव भीववि राक्षसेशा
तो सांगि, "हो ! मज न ठाउक वालि" कैसा ?

डॉक्टरांचा हा मराठी अनुवाद मूळास धरून आहे. परंतु निव्वळ भाषेच्या माध्यमाने भाव व्यक्त होत नाही या सत्याची प्रतीति या ठिकाणीं पटते. मूळ रामचरितमानसांत अंगदानें रावणास उत्तर दिलें की, ' मी अंगद नांवाचा वालीचा मुलगा आहे. तुझी आणि त्या वालीची कधी भेट झाली आहे कां ? ' अंगदाच्या उत्तरांतील खोच लक्षांत येतांच रावण ओशाळला आणि म्हणाला, ' हो ! वाली नांवाचें एक माकड होतें तें मला ठाऊक आहे '. मराठी अनुवादांत मूळांतील हा हास्यरस संक्रमित झालेला नाही. अंगद आणि रावण या उभयतांच्या संवादांत भरपूर मनोविश्लेषण आहे. अगदी थोड्या शब्दांत तें तुलसीदासजींनी व्यक्त केलें आहे. एकादी ' रामलीला ' पाहतांना त्यांतील पात्रांच्या 'नाट्या'मुळे तें ताबडतोब लक्षांत येतें. आणि गोस्वामीजींच्या मनोविश्लेषणाची, शब्दसंकेताची आणि सूक्ष्म व संयत हास्याची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच वाटूं लागते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समाजाच्या मर्यादापालनावर तुलसीदासजींचा विशेष कटाक्ष आहे. त्याशिवाय धर्म सुस्थिर राहणें शक्य नाही. यासाठी त्यांनी आपल्या काव्यांत समाजाच्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांसंबंधीं मधून मधून विवेचन केलें आहे. स्त्रीजातीसंबंधी तुलसीदासांनी आपल्या काव्यांत जागजागीं आदरच प्रकट केला आहे. परंतु कांही टीकाकार

> ‘ढोल, गँवार, सूद्र, पसु, नारी
> सकल ताडनाके अधिकारी
> किंवा
> नारी सुभाउ सत्य कवि कहहीं
> अवगुण आठ सदाउर रहहीं
> साहस, अनृत, चपलता, माया
> भय, अविवेक, असौच, अदाया

या त्यांच्या उक्ति ऐकतांना मागील पुढील संदर्भ लक्षांत न घेतांच अकारण टीका करतात. वस्तुतः यांपैकी

> ‘स्त्री, ढोल, गांवढळ, शूद्र, पशूसमान
> हे ताडणा सकळ पात्रचि होति पूर्ण’

ही निंदात्मक उक्ति सागराने सेतुबंधनसमयीं रामाची श्रेष्ठता व स्वतःची तुच्छता दर्शवितांना काढली आहे. आणि,

> ‘नारि स्वभाव कविवर्णित सत्य होय
> की अष्ट दोष असती हृदयीं तदीय
> चांचल्य, साहस, असत्य, अशौच, माया
> भीरुत्व, निर्दयपणा, अविवेक हो यां’

ही उक्ति मूर्ख रावणाने मंदोदरीपुढे आपलें महत्त्व प्रदर्शित करतांना काढली आहे. तात्पर्य, टीकाकारांनी निष्कर्ष काढतांना मागील पुढील संदर्भ आणि परिस्थितिविशेष यांचा आधी विचार करणें आवश्यक आहे.

डॉ. श्रीखंडे यांचा हा मराठी अनुवाद सर्वत्र सारखाच सुंदर व सरस उतरला आहे. तो करतांना ते मूळाशीं इतके समरस झाले आहेत की, मूळ हिंदींतील ‘गाल बजाना’, ‘छोटे मुंह बडी वात कहना’, ‘हात मलना’ इत्यादि वाक्प्रयोग त्यांनी ‘हें बोलतां फुगवुनी तुम्हीं गाल कैसें ?’ ‘छोटया मुखें करिसि तूं बहु थोर वार्ता,’ ‘कर चोळि रागें’ अशा स्वरूपांत मराठींत आणले आणले आहेत. मधून मधून ‘पुकार’ ‘रटती’ आदि हिंदी शब्दहि प्रयुक्त केले आहेत. मराठीची शब्दसंपदा वाढविण्याच्या दृष्टीने हें योग्यच आहे. कांही ठिकाणीं तर डॉक्टरांचा अनुवाद मूळापेक्षाहि उत्तम व उत्कष्ट साधला आहे. उत्तरकांडांतील ११ व्या तरंगांत तुलसीदासांनी असंतांचें वर्णन करतांना त्यांचें एक लक्षण सांगितलें आहे—

> ‘झूठइ लेना झूठइ देना
> झूठइ भोजन झूठ चवेना
> बोलहि मधूर बचन जिमि मोरा
> खाइ महा अहि हृदय कठोरा’

हेंच मराठींत किती प्रभावी वठलें आहे तें पहा—

> खाणें सर्व लवाडीचें चावणेंही लवाडि की
> खळांचें सर्वही खोटें देणें घेणें ठकाठकी !
> बोलती मधुर वाणी मयूरापरि दुर्जन
> महासर्पहि खाण्याचें काठिण्य हृदयीं पण

डॉक्टरांनी या ‘अनुष्टुपां’त रामदासी शैली गिरवल्यामुळे एक प्रकारचा ‘आवेश’ उत्पन्न झाला आहे. पुढील संतलक्षणाचा अनुवादहि असाच प्रभावोत्पादक आहे—

> ‘संत हृदय नवनीत समाना
> कहा कविन्ह परि कहै न जाना
> निज परिताप द्रवइ नवनीता
> परदुख द्रवहिं संत सुपुनीता’
> आहेत साधु हृदयें नवनीत ऐशीं
> ऐसें कवी वदति तें नकळे तयांसी !
> तापें द्रवे अपुलिया नवनीत सत्य
> अन्यार्ति त्या द्रववितें सुजनासि नित्य !

गोस्वामीजींनी आपलें काव्य ‘स्वान्तः सुखाय’ ‘भाषानिबंधमतिमंजुलमातनोति’ केलें होतें. परंतु तें ‘परहितकारक’हि ठरलें. यावरूनच त्यांचें श्रेष्ठत्व दिसून येतें. आपल्या काव्याच्या शेवटीं त्यांनी—

> ‘मोसम दीन न दीनहित तुम्हसमान रघुवीर
> अस विचारि रघुवंसमनि हरहु विषम भवभीर’

असे उद्गार काढले आहेत. त्यांचें डॉक्टरांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'न दीन माझ्यासम रामराया ।
तुम्हां असा दीनदयाळही न ।।
रघूत्तमा ! जाणुनी हें हरावी ।
संसारिंची दारुण भीति पूर्ण।।

असें मराठीकरण केलें आहे. आणि,

ऐसें या 'मानसा'चें अविरत घडलें स्नान मन्मानसाला

असा अपूर्व आनंद व्यक्त केला असून,

'जयदेव जयदेव जय तुलसीदासा !'

अशी श्री तुलसीदासांची भक्तिभावानें आरती केली आहे. डॉक्टरांचा अनुवाद आणि मूळ यांचा अभ्यास करतांना माझाहि कांही काळ सुखासमाधानांत व्यतीत झाला. डॉक्टरांनी अनुवादाचें हें महत्कार्य करून महाराष्ट्र साहित्यावर अनंत उपकार केले आहेत. एतदर्थ पुढील सहा दोह्यांत मी त्यांचें साभिवंदन अभिनंदन करतों.

चित्रकूट घाटावरी जुळे संतसमुदाय
तुलसी चंदन घाशितो लावि टिळे रघुराय
प्रसंगास त्या जाहली आता शतकें चार
पण तुलसीनें घेतला आज पुन्हा अवतार
आला घेउन 'तीन' तो 'श्रीखंडे' समवेत
श्रीखंड्यांच्या श्रीकरीं तीं आम्हांला देत !
शीतल सुखकर तीं किती पाप–ताप हो दूर
महाराष्ट्र भाषेंत ये गंधरसांना पूर !
करवीरीं सिद्धीस ने श्रीखंडे संकेत
'रामचरितमानस' रची महाराष्ट्रभाषेंत !
अभिनंदन त्यांचें असो जोडुन दोन्ही हात !
श्रीतुलसीचरणांबुजीं साष्टांग प्रणिपात !!

—भ. श्री. पं.

सावली

[कवि : सूर्यकांत खांडेकर, एम्. ए. किंमत २ रुपये. विक्रेते—व्ही व्ही. लिमये अँण्ड सन्स. महाद्वार रस्ता कोल्हापूर]

गेल्या आठ दहा वर्षांतील नवागतांत कोल्हापूरचे तरुण कवि सूर्यकांत खांडेकर यांचें काव्य रसिकांच्या नजरेंत सहज भरेल इतकें ठळक आहे. प्रस्तुत काव्य-संग्रहांत त्यांच्या एकूण ७१ कविता समाविष्ट करण्यांत आल्या आहेत. त्यांत दैवत, आज युगाचा अंत जाहला, ज्ञानेशा, म. ल. ग. हायस्कूलच्या परिसरांत यांसारख्या, आत्मीयता व आदर यांनी विनम्र झालेल्या साध्या परंतु सुंदर कविता आहेत. त्याचप्रमाणे ज्यांत कामरूपिणी सृष्टीचें अव्याजमनोहर छायाचित्र अंकित झालें आहे अशा रान, निळसर डोंगर, रंकाळयाच्या तीरावर यांसारख्या निसर्गवर्णनपर कविताहि आहेत. परंतु खांडेकरांच्या प्रतिभेचें वैशिष्टय या प्रकारच्या कवितांत नाही. त्याचें खरें खरें प्रत्यंतर त्यांच्या प्रणयपर कवितांत पटतें.

खांडेकरांचें महाविद्यालयीन जीवन संपल्याला अजून फार दिवस झालेले नाहीत. त्यांचें भावविवश मन अद्यापि तारुण्याचा आरंभींचा नाजुक भर आणि पुढील पौरुषपूर्ण उत्तरदायित्व यांच्या उंबरठयावर रेंगाळत आहे. अपार्थिव प्रेम आणि पार्थिव प्रणय यांच्यांतील सूक्ष्म सीमारेषा अजून पुरतेपणीं त्यांच्या लक्षांत आलेली नाही. प्रणयांत 'हें जीवित अपुलें लोहमार्ग की दोन । नाहीच जायचें कधी एक होऊन' अशी समांतर रेषांची स्थिति नेहमीच असते. प्रेमांत रेषांचें द्वैत नसतें. त्याला एकच 'सुरेखा' माहीत असते. प्रणय म्हटला म्हणजे तो अबोल व दूरचा असावयाचाच तसाच तो सूर्यकांतांच्या कवितेंत आहे याची साक्ष 'वाट' आणि 'अनुदिन यावें' या कविता देतात. प्रणय असा क्षणिक आणि वंचक असलात री तो गोड नाही असें मात्र नाही. तो स्वभावानें उतावळा व भाबडा असल्या-मुळे त्याचा राग येत नाही. उलट त्याच्याबद्दल एक प्रकारची माया वाटते. महाविद्यालयीन जीवन म्हणजे तारुण्याचा पहिला वहिला बहर तेथील तीं चार वर्षे म्हणजे यौवनाच्या यक्षभूमींतील संचार. त्या काळांत प्रत्येक तरुण हा दिवास्वप्नें पाहणारा कमलभक्षक असतो. खांडेकर हे अर्थातच या नियमास अपवाद नाहीत. तारुण्याच्या जबाबदारीच्या काळास सुरुवात झाली म्हणजे मग मात्र या गतजीवनाबद्दल थोड्या फार फेरफारानें केवळ गंमत म्हणून असे उद्गार काढावे लागतात की, 'या इथेंच सरलीं क्षणांत वर्षे चार । या इथेच केले वेडे वेडे चार'.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खांडेकरांची प्रतिभा ही मूळांतच वैणिक आहे. त्यांच्या एकंदर रचनेवर खेडयापाडयांत प्रचलित असणाऱ्या जुन्या लोकगीतांची, शाहिरां- च्या लावण्यांची आणि हलक्या फुलक्या भाव- गीतांची गडद सावली पडली आहे. त्यांच्या अनेक कविता लावणीच्या घाटणीवर आहेत. याला कारण कदाचित् त्यांच्या सभोवतालचें संस्थानी वातावरण असावें. या प्रकारच्या त्यांच्या कवितांतील राघूमैनांचे संकेत आता जुनाट झालेले असले तरी ते सुरस व मनोरंजक वाटतात. त्यांच्या कित्येक कवितांतील पार्श्व- भूमि मध्ययुगांतील मऱ्हाटेशाहीची वाटते. या त्यांच्या कवितांतील स्त्रीपुरुषप्रणय हा निकोप, घडधाकट व मोकळया मनाचा आहे. तो या देशांतील परंपरेस साजेसाच आहे. मात्र या गीतांत सूक्ष्म व तरल मनो- भावनांना शब्दांत साकार करण्याचा प्रयत्न कोठेच दिसत नाही. त्यांत बहुतेक ठिकाणीं बहिरंगच आहे. शृंगार आणि तोहि वेधक आहे. परंतु त्यांत अंगार आहेत. त्यामुळे कुठे कुठे चटकेहि आहेत. अर्थात् त्यांतहि एक प्रकारची और मौज आहे. वानगीदाखल हें एक गीत घ्या—

देवाघरचा अमर विहग तूं, रसवंती तव थोर
कशी घालिते मोह मना तुज दीड दमडिची पोर ?

वरदहस्त तूं सरस्वतीचा, गुलाम वनुनी हिच्या प्रीतिचा
गीतामाजीं गुंफिसि कां हें यौवनरूप छचोर ?

मायाविनि ही अदय अंगना, भंवतीं भंवतीं करित गुंजना
नकोच हुंगूं फूल अफूचें भरलें गरलें घोर ?

मात्र या गीतांत सुस्काऱ्यांचे सूर नाहीत. कवीचें मन हें खुलें, कणखर आणि आशावादी आहे. त्या दृष्टीनें श्लेष साधलेल्या या दोन ओळी स्मरणीय आहेत—

ये निराशे ! ओक माझ्या जीवनीं तूं काजळी
सूर्य मी सामर्थ्यशाली घेतसे तुझा बळी !

खांडेकरांचें हें कविमन त्यांच्यासंबंधी महान अपेक्षा निर्माण करणारें आहे. त्यांच्या या संग्रहांत 'सौंदर्य', 'प्रभो', 'अवचित ये जाग मला' यांसारख्या कांही काव्यमय तात्त्विक कविता आहेत. त्या वाचल्या म्हणजे या विधानाची प्रतीति पटेल—

अवचित यें, जाग मला
क्षितिजाच्या सीमेवर
गगनाच्या फलकावर
विश्वाचें दिव्य काव्य
हें अगाध, हें अनंत
उत्तररात्रींत मला
तूंच मला जागविलें
दूर अनंतांत मला
एकटाच मी येथें
गहिवरला अंधारहि

सरलेली मध्य निशा
अजुन दूर दूर उषा
ताऱ्यांनी लिहिलेलें
वाचुनिया मन दिपलें !
विश्वसख्या, रूप तुझें
दर्शन दे कोण दुजें ?
अवचित की झोपेंतुन
नेशिल कां बोट धरून ?
तूं कोठें येसी पण ?
गहिवरलें वहनि गगन !

—भ. श्री. पं.

व्यापार

(संपादक : श्री. एम्. आर्. ढेकणे, पुणे)

पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ् कॉमर्सचें मार्च १९५५ चें 'व्यापार' हें नियतकालिक एक महा- विद्यालयीन प्रकाशन या दृष्टीनें सर्वसाधारण 'कॉलेज मॅगझिन' सारखेंच आहे. त्यांत इंग्रजी विभागासाठी अर्ध्यापेक्षा अधिक पृष्ठें खर्च झालेलीं असून मराठी भाषेसाठी अवघीं २१ पानें देण्यांत आलेलीं आहेत. वास्तविक पाहतां हळूहळू इंग्रजीचें माहात्म्य कमी व्हाव- यास पाहिजे आणि प्रादेशिक भाषांना मानाचें स्थान मिळावयास हवें. मातृभाषा हें शैक्षणिक माध्यम म्हणून अंगीकारल्यावर तर हा बदल अधिक निकडीचा वाटतो.

मराठी विभागांतील सुटका, भारताच्या हात- माग धंद्यापुढील यक्षप्रश्न, प्राचीन भारतांतील व्यापार इ० लेख चांगले आहेत. त्यांतून विद्यार्थ्यांच्या अभ्यासू आणि व्यासंगी प्रवृत्तीचें दर्शन होतें.

संपादक मंडळ पांच प्राध्यापकांचें बनलें आहे. त्याऐवजी एखाद्या अनुभवी प्राध्यापकाच्या मार्गदर्शना- खाली जर विद्यार्थ्यांनी या नियतकालिकाचें संपादन केलें तर सर्वच दृष्टींनी तें अधिक औचित्यपूर्ण होईल.

म. अ. चा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्मृति–कुंज

(लेखक : स्वामी राम, प्रकाशक चि. भा. पटवर्धन, पुणें; पृष्ठें २२७, किंमत २॥ रु.)

उत्तर भारत आणि काश्मीरमध्यें अनेक वर्षें वास्तव्य असलेले, परंतु मूळचे महाराष्ट्रीय असलेले श्री स्वामी राम यांच्या जीवनांतील कांही प्रसंग 'स्मृति–कुंज' या ग्रंथांत नुकतेच प्रकाशित करण्यांत आलेले आहेत. निर्भयता, संघटन व आनंद या गुण-त्रयींच्या साहाय्यानें गगनानंद, भूतनाथ इ० गुंफांत किंवा मरीचि ऋषीच्या आश्रमांत अथवा गोपीतीर्थ म्हणून त्यांनी स्वतः स्थापन केलेल्या तीर्थक्षेत्रीं त्यांनी स्वतःची जीवनसाधना कशा रीतीनें प्राप्त करून घेतली याचें मोठें हृदयंगम वर्णन सुबोध आणि रसाळ भाषाशैलींत या ग्रंथांत ग्रथित केलेलें आहे. ठिकठिकाणीं त्यांनी शिष्यांना आणि साधकांना जें उपदेशामृत दिलें त्याचेंहि विवरण या ग्रंथांत सविस्तर देण्यांत आलें असून इंद्रजाली चमत्कारापासून आणि जडीबुटीच्या जादूगिरीपासून दूर असलेलें हें आधुनिक काळांतील पहिलें संतचरित्र होय. 'संतचरित्रें परम पवित्रें...' या आपल्या तरुण भारतांतील अग्रलेखांत श्री ग. त्र्यं. माडखोलकर यांनी जुन्या पठडींतल्या संतचरित्रावर जो आक्षेप घेतलेला आहे त्याचें संपूर्ण निरसन 'स्मृति कुंज' या ग्रंथानें होण्यासारखें आहे. श्री स्वामी राम यांनी कोणत्या कठीण परिस्थितींत साधनेला प्रारंभ केला, त्यांच्यावर घनघोर अरण्यांत किंवा अमरनाथ-कडील हिमगिरींत कोणते प्रसंग गुदरले, त्यांतून त्यांचा जीवन–विकास कसा झाला, अशाहि स्थितींत त्यांनी अढळ तप आणि ध्यानधारणा कशी केली व आत्मबल कसें प्राप्त करून घेतलें याचा मोठा रोचक वृत्तांत या ग्रंथांतील प्रत्येक पानापानावर आढळतो. साधकांनी तसेंच बुद्धिनिष्ठ चिकित्सिकांनी हा ग्रंथ अवश्य वाचण्यासारखा आहे.

म. अ. चा.

पडघवली

(लेखक—गो. नी. दांडेकर; प्रकाशक, मौज प्रकाशन, मुंबई ४; किंमत रु. ४॥)

पडघवली ही एक नवीन विषयाचा परामर्श घेणारी, नवीन पद्धतीची कादंबरी आहे. ही कांही कादंबरी नव्हे असा निर्वाळा लेखकानें प्रस्तावनेंतच दिला आहे. त्याचें कारण एवढेंच की अगदी काटेकोर रीतीनें कादंबरीच्या तंत्राचे नियम पडघवलीला लावून पाहिले तर कदाचित् चोखंदळ टीकाकार नियमभंगाचीं अनेक स्थळें दाखवून देऊं शकतील असें त्याला वाटलें असावें. पण प्रत्येक वाचक कांही चोखंदळ टीकाकार नसतो. त्याचें साहित्यिक मूल्यमापन एका स्थूल कसो-टीवर होत असतें. जें साहित्य वाचून त्याला संतोष होतो, त्याच्या भावनांचें शोधन होतें, त्याचा दृष्टिकोन अंशमात्र का होईना, विशाल होतो आणि मनाच्या उन्नयनाचा अनुभव येतो तें त्याच्या दृष्टीनें सत्साहित्य. तो ह्यांत तंत्र आहे का, मनोविश्लेषण, अंतःप्रवाह सुप्त मनाच्या हालचालींचें प्रतिबिंब आहे का किंवा अद्यावत् रसिकाला (?) जें आवडायला हवें तें ह्यांत आढळतें कां, ह्याचा विचार करीत नाही. अशा साऱ्या भोळ्या वाचकाला मोहून टाकण्याचें सामर्थ्य पडघवलीमध्यें आहे, हीच तिची महत्ता आहे.

पडघवली हें एक खेडें आहे. कोकणांतलें नवीन वसलेलें खेडें. नवीन म्हणजे मुरुडजंजिऱ्याच्या हबशांच्या चाचेगिरीनें कोकणची दाभोळपट्टी ज्या काळीं त्रस्त झाली होती त्या काळीं हें खेडें वसलें कसें, भरभराटीला आलें कसें आणि त्याच्या वैभवाला ओहोटी लागून तें कंवर खचल्यागत बसलें कसें, ह्याचा इतिहास म्हणजे ह्या कादंबरीचें संविधानक. हा इतिहास कादंबरीच्या नायिकेनें निवेदन केला आहे. ती इतिहासाची निरू-पणकार आहे म्हणूनच नायिका म्हणायची. तिची भूमिका तशी नाही, लेखकाचा तसा आग्रह तर दूरच, निव्वळ सूचनहि तसें नाही. ती निव्वळ निरूपणकार आहे, मीमांसा किंवा भाष्य हा तिचा अधिकार नाही. पडघवलीला अवकळा का आली ह्याची मीमांसा वाच-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कांनी करायची आहे. लेखकाने खेड्यांना जी मरगळ आली आहे हिची उपपत्ति लावली आहे. प्रस्तावनेंत लेखक म्हणतो, 'कारखाने आणि उद्योगधंदे यांचें केन्द्रीकरण झाल्यामुळे खेड्यांतील नवसर्जनशील मनुष्य-शक्तीचें शहरांत जें बिलिनीकरण होत आहे, तें भयानक आणि विचारी माणसाला चिंतित करणारें आहे. 'पडघवली' या सर्व मरगळ आलेल्या खेड्यांची प्रतिनिधि आहे.'

अर्थात् हें लेखकाचें मत झालें. हें मत ग्राह्य की अग्राह्य हें अर्थशास्त्री आणि समाजशास्त्री ठरवतील. पण निवेदनामधून हें मत तत्त्वमथित म्हणून आपोआप प्रकट होतें का ह्याचा विचार केला तर तें अस्फुट रीतीनेंहि प्रकट होत नाही, असें म्हणावें लागतें. लेखकाने जर तें नमूद केलें नसतें तर कादंबरींतून निव्वळ ध्वनीनेंहि तें सुचलें नसतें.

हा दोष निर्माण व्हायला व्यंकूभावजी ह्या खलपात्राचें चित्रण जबाबदार आहे. व्यंकूभावजींचें खलत्व हें परिस्थितिजन्य नाही, आणि त्याचा व शहरांतील केन्द्रीकरणाचा सुतराम् संबंध नाही. लेखकाला तो प्रस्थापित करतां आला नाही. तसा त्याने प्रयत्नहि केलेला नाही. व्यंकूभावजींचा दुष्टपणा जन्मजात आहे. त्याचा पिंडच तसा आहे. 'पण लक्ष्यांत कोण घेतो' मधील शंकरमामंजी आणि पडघवलीचे व्यंकूभावजी ह्यांची जाति एक. स्वतःच्या अल्पहि सुखासाठी दुसऱ्याचा बळी घेण्यांत ह्यांना आनंद. दुसऱ्याला नासल्याशिवाय ह्यांना सुखाचे रोमांच अनुभवतां यायचे नाहीत.

म्हणूनच व्यंकूभावजींचें चित्रण फार सुंदर झालें आहे. त्यांत कसबीपणा नाही. पण कलात्मकता आहे. त्यांच्या दुष्टपणाची उपपत्ति लागत नाही म्हणून त्यांत परिहारक कारणांनी जो उणेपणा यायचा तो येत नाही. त्याचा दुष्टपणा शुद्ध, निखालस, अशबल आहे. म्हणूनच तो अभिजात आहे व त्याचें चित्रणहि अभिजातच उतरलें आहे.

व्यंकूभावजींचेंच चित्र सुंदर उमटलें आहे असें नाही. कुशात्या, तिचा वेडा रंगू आणि वेडी आशा. किती तिचा धीर आणि कसा तिचा प्रयत्न ! ज्या कोकणच्या माणसांनी खडकाळ खाडीच्या काठावर डोंगराळ भागांत कलमांच्या बागा उठविल्या त्यांच्या जातकुळीची ती. तिच्या आशा सफळ व्हायच्याच. पण तिचा प्रयत्न तीव्र असला तरी थिटा पडणारा. पण गुजाबा तिच्या पाठीशीं उभा राहिला. आणि...

सगळीं पात्रें कशीं जिवन्त. अगदी जीवनाने रसरसलेलीं. सगळीं कशीं सामान्य तरीहि आपापल्या परीने असामान्य. शारदा देखील पहाना. फक्त खिडकींत बसायचें बाकी ठेवलें तिने. पण ती देखील अगदी तुमच्या आमच्या सारखी. इतकीं बहुरंगी आणि तरीहि एकप्रवाही पात्रें निर्माण करण्याची शक्ति फार विरळा लेखकांच्या अंगीं आढळते. पडघवलींत अशीं किती तरी चित्रें आहेत. एक आटोपशीर लहानसें जगच त्यांत प्रतिबिंबित झालेलें आहे.

खेडेगावच्या कल्पना, भावना, श्रद्धा, विश्वास, परंपरागत आचारविचार; जणुं कांही लेखकाच्या श्वासाश्वासांत भिनून गेलेले आहेत. त्याच्या हृदयांत त्यांचें घर. कोठेच तटस्थ भूमिकेवरून केलेल्या निरीक्षणाचें शब्दचित्र नाही. त्रयस्थपणा तर दूरच राहिला. लेखक त्या गावचा साक्षी, त्या गावची अलिप्त एकजीवपणाने निगा करणारी ग्रामदेवता, वेशीवरचें दैवतच जसें कांही. अगदी सूक्ष्म, बारीक सारीक घटना, हकीकती त्याच्या स्मृतींत लेखलेल्या, निरूपण त्याचेंच. शब्द फक्त नायिकेचे.

म्हणूनच ह्या कादंबरीला मोठ्यांत मोठा साज, तींत प्रतिबिंबित झालेल्या सहृदय वेदनेचा. लेखकानें प्रस्तावनेंत जें म्हटलें आहे की 'हें शब्दचित्र अशा व्यथित मनोभूमिकेंतून निर्माण झालें आहे' तें अक्षरशः खरें आहे. त्यांत दंभ नाही. वाचकांकडून त्याची जी अपेक्षा 'त्यांचें लक्ष आपल्या जीर्णशीर्ण, कोसळूं पहाणाऱ्या खेड्यांतील घरकुलांकडे वळावें' हीहि रास्त आहे. पण ह्या कोसळण्याचा संबंध सुपारीचा ठोक व्यापार, मुंबईला रवाना होणारा आंबा, कोळश्यासाठी होणारा बागांचा निःपात किंवा नोकरीसाठी ग्रामत्याग करणारे कुळवाडी ह्यांच्या ओझरत्या उल्लेखानें मुंबईशीं जोडण्याचा प्रयत्न मात्र प्रभावी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटत नाही. फार झालें तर आंग्लाईनंतर कोर्टबाजीच्या इष्काची जी पहिली लहर वतनवाडीच्या घरंदाजावर वहरली तिला ह्या आपत्तींचें दूषण चिकटवतां येईल.

पण ही आहे कादंबरी. ही कांही बदलणाऱ्या समाज–व्यवस्थेची तत्त्वमीमांसा नव्हे. कादंबरी ह्या दृष्टीने 'पडघवली'चें स्थान उंच आहे. समस्या सोडवणारा प्रबंध म्हणून तिच्याकडे पहाणेंच चुकीचें. फक्त लेखकानें त्याला न सुटणाऱ्या ह्या प्रश्नाचा उल्लेख केला व त्यामुळे वाचकाच्या तशा अपेक्षा निर्माण होतात, म्हणूनच त्या अंगाने ह्या कादंबरीचा परामर्श घ्यावा लागला.

अशी सुंदर कादंबरी लिहिल्याबद्दल श्री. गो. नी. दाण्डेकरांचें व प्रसिद्ध केल्याबद्दल मौज प्रकाशनाचें अभिनंदन करायला हवें.

दि. व. पं.

म्हण "होय"....

म्हण "होय"; साक्ष बघ विधु गगनीं
क्षण अेक लवव लव लाज मनीं

लाज अुचित तुज जनसंमदीं
कां करि ती अेकान्तीं गर्दी
शशि देअी मदनाची वर्दी
घटि मंगल हीच न का रमणी ?—

भावगन्ध दरवळे मुखावर
पुष्पगन्ध मधु वृक्षलतांवर
मादक ते, मज करिति अनावर
गुंजती फुलांवर भ्रमर वनीं—

झुलविसि कां सखि ! या अधिर जना
भुलविशि कां अशि ! वृथा निज मना
अेकदाच वद त्या मधु वचना
त्या क्षणीं स्वर्ग होअिल अवनी—

म्हण 'होय' साक्ष बघ विधु गगनीं

—माधव जामदार

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभिरुचि व कलेचें मूल्यमापन

लेखक : नी. र. वऱ्हाडपांडे

कलेचे तज्ज्ञ

माझा एक मित्र साहित्याचा मोठा अभ्यासक आहे. साहित्याचा अभ्यास करायची त्याची रीत फार शास्त्रोक्त आहे. कोणतेंही पुस्तक वाचायच्या आधी त्या पुस्तकावर मोठमोठ्या टीकाकारांनी लिहिलेलीं पुस्तकें तो प्रथम वाचतो. ज्या पुस्तकावर मोठ्या टीकाकारांनी कांहीच लिहिलें नाही तें पुस्तक तो वाचीतच नाही. असलें पुस्तक वाचण्याच्या लायकीचेंच नसतें असें त्याचें मत आहे. मी त्याच्या घरीं कांही दिवस राहिलों होतों तेव्हा त्याचें "संपूर्ण बाळकराम"चें वाचन चाललें होतें. वाचन चाललें होतें असें म्हणण्यापेक्षा अभ्यास चालला होता असें म्हटलेलेंच जास्त बरोबर होईल. संपूर्ण बाळकरामच्या दहापट मोठी अशी त्याच्याजवळ एक वही होती. ही वही म्हणजे "संपूर्ण बाळकरामा"बद्दल टीकाकारांनी लिहिलेल्या लिखाणाचा ज्ञानकोशच होता. संपूर्ण बाळकरामाचा एक परिच्छेद वाचून झाला की माझा मित्र हा ज्ञानकोश उघडी. "पान इतकें, ओळ इतकी, शब्दनिष्ठ विनोद, दर्जा मध्यम" असें त्या ज्ञानकोशांत आढळलें की तो कनिष्ठ दर्जाचें मध्यम हास्य करी, कारण शब्दनिष्ठ विनोद कनिष्ठ दर्जाचा असतो, असें सर्व "तज्ज्ञांचें" एकमत आहे असें त्याचें मत होतें. "पान इतकें, ओळ नंबर इतका, प्रसङ्गनिष्ठ विनोद, दर्जा उत्तम" असें त्या ज्ञानकोशांत लिहिलें असलें की तो उत्तम दर्जाचें उत्तम हास्य करी. कारण प्रसंगनिष्ठ विनोद सर्व विनोदांत श्रेष्ठ असतो, असें टीकाकारांनी टीकागणिताच्या आधारें सिद्ध केलें आहे, असें त्याचें म्हणणें होतें. उत्तम, मध्यम व अधम दर्जाचें हास्य कसें हसावें याचें दिग्दर्शन करणारे कांही चित्रपट त्यानें खास स्वत:साठी करवून घेतले होते. या चित्रपटांत कलामर्मज्ञांनी प्रत्येक प्रकारचें हास्य हसून दाखवलें होतें. माझा मित्र तास न् तास या चित्रपटाकडे पाही व आपलें हास्य हुबेहुब त्याबरहुकूम उठवण्याचा अभ्यास करी. "माझा अभ्यास पुरा झाल्यावर मी स्वत:च कलातज्ज्ञ होणार आहे" असें तो मला मोठ्या आनंदाने सांगे.

टीकाकार व रत्नपारखी

माझ्या मित्राची साहित्याचा आस्वाद घेण्याची ही पद्धत ऐकून कांही लोकांना हसूं येईल; पण या पद्धतीला फार मोठमोठ्या साहित्यपुंगवांचा पाठिंबा आहे हें त्यांनी विसरतां कामा नये. कलाकृति चांगली की वाईट हें तज्ज्ञ लोक ठरवूं शकतात असें मत सर्वत्र प्रचलित आहे. रत्नपारखी ज्याप्रमाणें रत्नाची पारख करूं शकतो त्याप्रमाणे साहित्याचा सखोल अभ्यास करणारे लोकच त्याचें खरें मूल्य ठरवूं शकतात असें नेहमी गृहीत धरण्यांत येतें व यांत कांही हास्यास्पद आहे असें कुणाला वाटत नाही. उलट हें म्हणणें प्रथमदर्शनीं बरेंच सयुक्तिकही वाटतें. पण त्याची थोडी अधिक छाननी केल्यावर मात्र कलेचें मूल्य ठरवण्याचा अधिकार कलातज्ज्ञाला देतां येणार नाही. हें सहज दाखवून देतां येण्यासारखें आहे. रत्नपारखी आपल्यासमोर ठेवलेला पदार्थ हें रत्न आहे की कांच आहे, रत्न असल्यास कोणत्या जातीचें रत्न आहे हें सांगूं शकतो; याचें कारण असें आहे की 'रत्न' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या पदार्थांचे कांही विशिष्ट

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुणधर्म असतात. हे गुणधर्म रत्नपारख्याच्या अभिरुचीवर अवलंबून नसतात. त्यांचें अस्तित्व यांत्रिक उपकरणाच्या साहाय्याने देखील सिद्ध करतां येतें. रत्नाला विशिष्ट दर्जाची घनता असते. वक्रीभवनाचा एक निश्चित निर्देशांक (Refractive Index) असतो, व त्याच्या ठायीं एका निश्चित प्रमाणाची कठिणता असते. घनता तराजूच्या साहाय्याने मोजतां येते, वक्रीभवन वक्रीभवन मापकाच्या (Refracto-meter) साहाय्याने मापतां येतें. व कठिणता दोन पदार्थ एकमेकांवर घासून अजमावतां येते. रत्नपारख्याची अभिरुचि कांहीही असो त्याने वरील कसोट्या वापरल्यावरोबर रत्नाचे विशिष्ट गुणधर्म प्रतीत झालेच पाहिजेत. "अमुक अमुक गुणधर्म असले की त्या पदार्थाला रत्न म्हणावें" असें रत्नाबद्दल म्हणतां येतें व या गुणधर्मांची परीक्षा वैज्ञानिक उपकरणांच्या साहाय्याने करतां येते, म्हणून या कसोट्या करण्याच्या शास्त्राचा अभ्यास करणारा रत्नपारखी रत्नतज्ज्ञ समजला जाऊं शकतो. रत्नांचे गुणधर्म ओळखायला विशेष अभ्यासाची जरूर असते म्हणून "अमुक पदार्थ हें रत्न आहे की नाही ?" या बाबतींत सामान्य लोकांच्या मतापेक्षा रत्नपारख्याच्या मताला जास्त मान द्यावा लागतो.

रत्न आणि मोटरसायकल

"क्ष हें रत्न आहे की नाही ?" या प्रश्नाचा निकाल लावतांना रत्नपारख्याचें मत ग्राह्य असलें व त्यांत अभिरुचीचा संबंध येत नसला तरी त्या रत्नाचें मूल्य ठरवतांना मात्र अभिरुचीचा संबंध येतो. रत्नाच्या गुणधर्मांचें मोजमाप प्रयोगशाळेंत वैज्ञानिक उपकरणांच्या साहाय्याने होऊं शकत असलें तरी रत्नाच्या मूल्याचें मोजमाप त्या उपकरणांनी करतां येऊं शकत नाही. रत्नाचें मूल्य मागणी व पुरवठा या दोन तत्त्वांच्या आधारें ठरतें. "आपल्याजवळ रत्न आहे" या भावनेंत समाधान मानणारे लोकच जर जगांत नसते व या समाधानासाठी हजारो रुपये खर्चायला ते तयार नसते तर रत्नाचें व दगडाचें मूल्य सारखेंच ठरलें असतें. "मूल्य" हा मानवी भावनाशीं संबंध नसलेला गुणधर्म नाही. कोणत्याहि पदार्थाविषयी मानवाच्या भावना काय आहेत याचा विचार केल्याशिवाय त्याचें मूल्य ठरवितां येत नाही. मूल्याचें अस्तित्वच याप्रमाणें भावनांवर अवलंबून असल्यामुळे "मूल्य" हें सर्वस्वी वैयक्तिक सत्य आहे. ज्याला रत्नें जवळ बाळगण्यांत मुळीच आनंद होत नाही त्याच्या दृष्टीनें रत्नांचें मूल्य शून्य आहे; व त्याची दृष्टि चुकीची आहे असें म्हणायचा कोणत्याहि रत्नपारख्याला अधिकार नाही. रत्नांची पर्वा न करणारा मनुष्य रत्नपारख्याला म्हणेल "बाबारे माझ्यासमोर ठेवलेला दगड हें रत्न आहे हें तुझें म्हणणे तूं या बाबतींतला तज्ज्ञ म्हणून मी कबूल करतों, पण मला रत्नें नकोच आहेत. हजार रुपये देऊन हें रत्न विकत घेण्यापेक्षा मी हजार रुपयांची एक मोटर सायकल विकत घेईन. मोटर सायकलीवर वाऱ्याच्या वेगानें हिंडण्यांत जो आनंद होतो त्याची किंमत मी हजार रुपयांच्या बरोबरीची समजतों. पण 'मी या रत्नाचा मालक आहे.' असें सांगण्यांत मला मुळीच आनंद होत नाही व असें सांगतां यावें म्हणून मी एक कवडीहि खर्चायला तयार नाही." असें म्हणणं चूक आहे हें कोणत्या वैज्ञानिक कसोट्यांच्या आधारें सिद्ध करतां येईल ? रत्नपारखी फक्त एवढेंच म्हणूं शकेल की, "तुला रत्नें बाळगण्यांत मुळीच समाधान होत नसेल. पण ज्यांना रत्नांची हौस आहे असे हजारो लोक जगांत आहेत. मी आपला त्यांच्याकडेच जातों." व "या रत्नाचें मूल्य हजार रुपये आहे की नाही ? " हें कोणत्याहि प्रयोगिक कसोट्यांनी कळणार नाही. त्या रत्नासाठी हजार रुपये द्यायला तयार असलेले लोक जगांत आहेत की नाहीत यावर तें मूल्य अवलंबून राहील. "या रत्नाची किंमत इतकी आहे" असें जेव्हा रत्नपारखी सांगतो तेंव्हा 'या रत्नासाठी इतके रुपये द्यायला तयार असलेले पुष्कळ लोक जगांत आहेत." असा त्याच्या म्हणण्याचा अर्थ असतो, म्हणजे त्या रत्नाविषयीं लोकांच्या भावना काय आहेत हेंच तो सांगत असतो. पण "या रत्नाचा वक्रीभवन-निर्देशाङ्क (Refractive Index) इतका आहे" असें सांगतांना त्या रत्नाविषयीं लोकांच्या भावना काय आहेत हें सांगितलें जात नाही. वक्रीभवन निर्देशाङ्क हा गुणधर्म मानवी भावनांवर अवलंबून नाही, पण मूल्य

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हा गुणधर्म मानवी भावनांशिवाय अस्तित्वांतच राहूं शकत नाही.

साहित्याचार्य आणि बल्लवाचार्य

मूल्य मानवी भावनांवर वा अभिरुचीवर अवलंबून असतें या विधानाची सत्यता खाद्य पदार्थांच्या बाबतींत नेहमी प्रत्ययाला येते. कोणत्याहि पदार्थाची चव चांगली की वाईट हें ठरवणारा मी तज्ज्ञ आहें व माझें मत इतरांनी ग्राह्य मानलें पाहिजे असें कुणी म्हणूं लागला तर आपण त्याला वेड्यांत काढूं. खाणाऱ्यांना रुचकर वाटणारे पदार्थ तयार करण्याच्या कलेंत एखादा माणूस निष्णात असतो व असे पदार्थ कसे करावे या बाबतींत तो तज्ज्ञ म्हणून त्याचा सल्ला घेतां येईल. पण "मी तयार केलेल्या पदार्थांची चव चांगली की वाईट या बाबतींत देखील तुम्ही माझाच सल्ला घ्या, मीं पदार्थ चांगला झाला आहे असें म्हटलें की तुम्ही मिटक्या मारा, व मीं वाईट झाला आहे असें म्हटलें की तुम्हीहि तोंड वाईट करा." असें एखादा बल्लवाचार्य म्हणूं लागला तर कलाकृतीचें मूल्य ठरवण्याचा आपल्याला अधिकार आहे असा दावा सांगणारे टीकाकार सुद्धा त्याला बजावून सांगतील की "सैंपाकीबुवा! तुमचा अधिकार फक्त सैंपाकघरापुरता. पदार्थ एकदा ताटांत वाढला की खाणाऱ्याचा अधिकार सुरूं होतो. चवीच्या बाबतींत खाणारा हाच तज्ज्ञ व खाणारा हाच न्यायाधीश."

चवीच्या बाबतींत खाणाऱ्याचें मत जसें प्रमाण, तसेंच साहित्याच्या उत्कृष्टतेच्या बाबतींत वाचकाचें मत प्रमाण मानलें पाहिजे. कितीहि निष्णात टीकाकार असला तरी हॅम्लेट नाटक चांगलें आहे की नाही या बाबतींतल्या त्याच्या मताला सर्वसाधारण वाचकांच्या मतापेक्षा जास्त किंमत देतां येत नाही. हॅम्लेट हा क्रियाभीरु होता की पापभीरु होता, त्याचें ऑफिलियावर प्रेम होतें की नाही, तो वेडा झाला होता की वेडाचें ढोंग करीत होता, या बाबतींत टीकाकारांच्या मताला सर्वसाधारण लोकांच्या मतापेक्षा जास्त मान देतां येईल. कारण या प्रश्नांचीं उत्तरें कुणाच्या आवडीनिवडीवर अवलंबून नाहीत. पण हॅम्लेट हें नाटक चांगलें आहे की नाही हें तें प्रेक्षकांच्या मनावर काय परिणाम करतें यावर अवलंबून आहे. वरील प्रश्नांचीं उत्तरें कांहीहि असलीं तरी प्रेक्षकांच्या मनावर होणारा हा परिणाम जसाच्या तसाच कायम राहील. हॅम्लेट नाटकांत अमुक अमुक आहे, त्याअर्थी प्रेक्षकांच्या मनावर त्याचा चांगला परिणाम झालाच पाहिजे असा एखादा टीकाकार आग्रह धरूं लागला तर "मी अगदी शास्त्रोक्त रीतीनें कोट शिवला आहे. तो तुम्हाला घट्ट होत असेल तर तुमचें शरीरच 'चुकलेलें' व 'अशास्त्रीय' आहे" असें म्हणणाऱ्या शिंप्याप्रमाणें तो हास्यास्पद ठरेल.

उच्च अभिरुचि आणि नीच अभिरुचि

साहित्याच्या बाबतींत वाचकाची आवडनिवड किंवा अभिरुचि हाच सर्वोच्च न्यायाधीश आहे. असें असून देखील कलेचें मूल्य हें खाद्य पदार्थांच्या मूल्यासारखें केवळ अभिरुचीवर अवलंबून नाही. त्यांत कांहीतरी अधिक वस्तुनिष्ठता आहे, असा अनेक लोकांचा आग्रह आहे. या आग्रहांच्या मुळाशी "माझी अभिरुचि इतर लोकांवर बंधनकारक असली पाहिजे" हा आग्रह असतो. या आग्रहांतूनच "उच्च" अभिरुचि व "हीन" अभिरुचि हे भेद निर्माण झाले आहेत. "उच्च" व "हीन" अभिरुचीमध्ये नक्की कोणता वस्तुनिष्ठ भेद आहे हें कुणालाच सांगतां येत नाही. व्यवहारामध्ये "ज्यांची अभिरुचि माझ्यासारखी नाही त्यांची अभिरुचि हीन असते व ज्यांची अभिरुचि माझ्या अभिरुचीशीं तंतोतंत जुळते त्यांची अभिरुचि 'उच्च' असते" एवढाच या भेदाचा एकमेव निकष असतो. अभिरुचीच्या उच्चनीचतेची ही कल्पना किती भ्रममूलक आहे हें दाखवून देण्यासाठी मूल्य म्हणजे काय याची थोडी फोड केली पाहिजे.

"क्ष" ही वस्तु चांगली आहे" असें जेव्हा मी म्हणतों, तेव्हा त्याचा अर्थ काय असतो? याचा अर्थ ऐवढाच असतो की "क्ष"या वस्तूमुळे माझ्या मनांत अनुकूल भावना निर्माण होतात. या अनुकूल भावनांच्या कमजास्तपणावरून, किंवा त्या कोणत्या कारणानें उत्पन्न झाल्या व त्यांच्याबरोबर इतर कोणत्या भावना

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

उदित झाल्या, यावरून त्यांना सुख, समाधान, आनंद वगैरे अनेक प्रकारचीं नांवें देण्यांत येतात. पण या भावनांना कोणतेंहि नांव दिलें तरी त्या "अनुकूल" वाटतात हा त्यांचा प्राणभूत गुणधर्म आहे. त्याचप्रमाणे "क्ष" ही वस्तु वाईट आहे" असें जेव्हा मी म्हणतों तेव्हा या म्हणण्याचा अर्थ एवढाच असतो की त्या वस्तूमुळे माझ्या मनांत "प्रतिकूल" भावना निर्माण होतात. या प्रतिकूल भावनांच्या कमजास्तपणावरून, किंवा त्या कोणत्या कारणाने उत्पन्न झाल्या व त्यांच्या-बरोबर इतर कोणत्या भावना उदित झाल्या यांवरून त्यांना दुःख, घृणा, करुणा वगैरे अनेक प्रकारचीं नांवें देण्यांत येतात. या भावनांना कोणतेंहि नांव दिलें तरी त्या "प्रतिकूल" वाटतात हा त्यांचा प्राणभूत गुणधर्म आहे. अर्थात् "चांगलें" व "वाईट" या कल्पनांच्या मुळाशीं भावनांची अनुकूलता वा प्रतिकूलता असते.

भावनेवाचून मूल्य कुठे आहे ?

वस्तूंचें मूल्य मानवी भावनांवर अवलंबून नाहीं असें म्हणणाऱ्यांना एकच प्रश्न विचारून गप बसवतां येईल. समजा अनुकूल वा प्रतिकूल भावना ज्यांच्या मनांत उदित होऊं शकतात असे संवेदनाशील प्राणीच जगांत नसते तर "चांगलें" व "वाईट" या शब्दांना कांही अर्थ उरला असता काय ? ज्या जगांत संवेदनाच नाहीत त्या जगांत गुलाबाचें फूल अस्तित्वांत राहूं शकेल, पण त्याचें 'सौंदर्य' अस्तित्वांत राहूं शकणार नाही. त्या फुलामुळे "वा ! छान" असा अनुभव

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल (निवडक मौलिक निबंधांचा संग्रह) रु. २–४–०
२. सुमन संचय (कविता संग्रह) रु. १–४–०
३. मराठी गद्य (मराठी साहित्यांतील निवडक वेचे) रु १–८–०
४. अंमलदार (नाटक) लेखक–श्री पु. ल. देशपांडे रु. २–०–०
५. भारती (नाटक) लेखक–श्री नाना जोग रु. १–८–०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका लेखिका–श्रीमती मालतीबाई श्रीखंडे रु. ०–१२–०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन —डॉ. मा. गो. देशमुख रु. ०–६–०
२. नाटककार गडकरी —श्री. द. रा. गोमकाळे रु. ०–६–०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार —कविभूषण ब. ग. ऊर्फ अण्णासाहेब खापर्डे रु. ०–८–०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत —प्रा. श्री. मा. कुळकर्णी रु. ०–८–०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ
केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निर्माण होऊं शकणार नाही, म्हणून त्याच्या ठायीं "सौंदर्य" हा गुणधर्म कल्पिणें निरर्थक ठरेल. तसेंच ज्या जगांत संवेदनाच नाहीत त्या जगांत कुरूपता किंवा हिडिसपणा अस्तित्वांतच राहूं शकणार नाही. ज्या जगांत कोणत्याच पदार्थामुळे "किळस", "उद्वेग" वगैरे भावना निर्माण होत नाहीत त्या जगांत कुरूपता असूं शकेल असें म्हणण्यांत काय अर्थ आहे ?

मूल्यांचें स्वयंसिद्ध अस्तित्व मानणाऱ्यांना दुसरें असें विचारतां येईल की ज्या पदार्थामुळे कुणाच्याच मनांत कधीहि अनुकूल भावना उत्पन्न होत नाहीत अशा एखाद्या पदार्थाच्या ठायीं "सौंदर्य" किंवा "माङ्गल्य" हे गुणधर्म असल्याचें ते दाखवून देऊं शकतील काय ? त्याचप्रमाणे ज्या पदार्थामुळे कुणाच्याहि मनांत कधीहि प्रतिकूल भावना उत्पन्न होत नाहीत त्या पदार्थाच्या ठायीं "कुरूपता" किंवा "अमङ्गलता" हे गुणधर्म असल्याचें एकतरी उदाहरण त्यांच्याजवळ आहे काय ? मूल्याचे जे जे अनुभव या जगांत येतात त्या सर्वांमध्ये अनुकूल व प्रतिकूल भावना अवश्यमेव असतातच. तेव्हा मूल्यकल्पना व भावनांची अनुकूल प्रतिकूलता यांची फारकत होऊं शकत नाही.

अनुकूल भावना निर्मिणें हें चांगलेपणाचें एकमेव लक्षण मानल्यावर नीतिशास्त्र व सौंदर्यशास्त्र यांतील सर्व प्रश्न सुटतात. या अनुकूल भावनांचें स्वरूप इतकें विविध असतें की "सुख", "आनंद" वगैरे कोणत्याहि एका शब्दानें त्यांचें पुरेसें वर्णन होऊं शकत नाही. पण कलेच्या बाबतींत या अनुकूल भावनेचें स्वरूप आनंदाचें असतें असें म्हणायला फारशी हरकत नाही. कलेचें मूल्य सर्वस्वी तिच्या आनंदनिर्मितीच्या सामर्थ्यांत आहे.

आनंद हा एकदा कलेच्या मूल्याचा निकष मानल्यावर "उच्च" कला व "नीच" कला या शब्दप्रयोगांचा अर्थ "जास्त आनंद देणारी कला" व "कमी आनंद देणारी कला" एवढाच होऊं शकतो. एखादी कमी आनंद देणारी कला जास्त उच्च "दर्जाचा" आनंद देते म्हणून दुसऱ्या एखाद्या जास्त पण कमी "दर्जा"चा आनंद देणाऱ्या कलेपेक्षा ती श्रेष्ठ आहे." असें म्हणणें निरर्थक आहे. कारण आनंदामध्ये उच्च व नीच असे दर्जे असूं शकत नाहीत. "जास्त उच्च दर्जाचा" म्हणजे "जास्त चांगला" असाच अर्थ आहे की नाही ? पण चांगला याच शब्दाचा अर्थ मुळी आनंददायक असा असल्यामुळे "जास्त चांगला" याला जास्त आनंददायक या पलीकडे दुसरा अर्थ असूं शकत नाही.

पेढा आणि मेघदूत

आनंदामध्ये उच्च व नीच असे भेद नसतात हें ऐकून कांही लोकांना एकदम धक्का बसेल. "काय म्हणतां ? सगळे आनंद सारख्याच दर्जाचे असतात ? मेघदूत वाचण्यांत होणारा आनंद व पेढा खाण्यांत होणारा आनंद यांचा दर्जा सारखाच ? रहस्यकथा वाचण्यांत होणारा आनंद व हॅम्लेट वाचण्यांत होणारा आनंद यांची किंमत एकच ? सिनेमा पाहण्यांत होणारा आनंद व समाधीचा ब्रह्मानंद हे एकाच मोलाचे आहेत ? असाच जर तुमच्या म्हणण्याचा अर्थ असेल तर यापेक्षा तुमच्या मताचा फोलपणा उघड करायला कोणतें मोठें प्रमाण पाहिजे ? एक आनंद दुसऱ्या आनंदापेक्षा श्रेष्ठ असतो हा अनुभव सार्वत्रिक आहे. एखादें एककल्ली मत सिद्ध करण्यासाठी हा सार्वत्रिक अनुभव दृष्टिआड करणें बरोबर नाही." असा आक्षेप ते माझ्या प्रतिपादनावर घेतील.

या आक्षेपाचा निरास करणें कठीण नाही. "अ" हा आनंद "ब" या आनंदापेक्षा श्रेष्ठ आहे असें जेंव्हा आपण म्हणतों तेंव्हा त्याचा एवढाच अर्थ असतो की "अ" या आनंदाचा विचार केल्याबरोबर माझ्या मनांत आदराची व सन्मानाची अनुकूल भावना निर्माण होते. ही भावना "ब" या आनंदाचा विचार करतांना तितक्याच प्रमाणांत निर्माण होत नाही. अर्थात् "अ" या आनंदाचें मूल्य "ब" या आनंदापेक्षा जास्त असतें याचें कारण त्या दोन आनंदांत मूल्याचा मूलभूत भेद असतो असा नसून "अ" या आनंदामुळे आदराची दुसरी एक आनंददायक भावना निर्माण होते व "ब" या आनंदामुळे ती होत नाही एवढाच आहे. "मेघदूत" वाचनाचा आनंद पेढा खाण्याच्या आनंदापेक्षा श्रेष्ठ आहे असें मी म्हणतों, कारण "मला मेघदूत वाचण्यांत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आनंद होतो" हा विचार मनांत आला की मला स्वतः-बद्दल आदर वाटूं लागतो. मेघदूताचें रसग्रहण करण्याचें सामर्थ्य माझ्यांत आहे या भावनेने माझा गौरव झाल्यासारखें मला वाटतें. उलट "पेढ्याचें रसग्रहण करण्याचें सामर्थ्य माझ्यांत आहे" या विचाराने अशी आत्मगौरवाची भावना उदित होत नाही. तात्पर्य ज्या आनंदाबद्दल सन्मानभावना असते त्या आनंदाची किंमत ज्या आनंदाबद्दल सन्मानभावना नसते त्या आनंदापेक्षा आपल्याला जास्त वाटते.

पूर्वसंस्कार

कांही आनंदाबद्दल अशी सन्मानभावना उत्पन्न होण्याचीं कारणें अनेक आहेत. त्यांतलें सर्वांत प्रभावी कारण म्हणजे ज्या संस्कृतींत आपण वाढलों त्या संस्कृतीने आपल्यावर केलेले संस्कार. आपल्या देशांत एक काळ असा की त्या काळीं संगीत व गायक हे हीन समजले जात होते. या काळामध्ये संगीताचा आनंद कमी दर्जाचा समजला जात होता व आपल्याला "गाणें-वजावणें" आवडतें असें चारचौघांत कबूल करायला लोक कचरत असत. लहानपणीं मुलांना हितोपदेश करणारें एक पुस्तक मीं वाचलें. त्यांत आदर्श व सद्‌गुणी म्हणून जो मुलगा चित्रित केलेला आहे त्याला गाणें ऐकण्याचा फार कंटाळा असतो व गाण्याच्या बैठकीच्या वेळीं तो झोपीं जातो, दुसरा एक बहकलेला मुलगा मात्र नेहमी गाण्याच्या बैठकींना जातो व संगीताची तान ऐकल्याबरोबर त्याचें देहभान हरपतें असें दाखवलें होतें. "फक्त बिघडलेल्या मुलांनाच गाणें आवडतें" अशा शिकवणुकींत वाढलेल्या मुलाला संगीतांत आनंद वाटला तरी तो कमी "प्रतीचा" आनंद आहे असें वाटल्याशिवाय कसें राहील ? संगीताप्रमाणेंच नाट्य ही एके काळीं कमी प्रतीची कला समजली जात होती. नाट्यकलेसारख्या "हीन" कलांच्या गुरूंचा उल्लेख षष्ठी विभक्तीनें न्याय व्याकरण वगैरे "उच्च" विद्यांच्या गुरूंचा उल्लेख पंचमी विभक्तीनें करावा असा संस्कृत व्याकरणांत एक नियम आहे. ("उपाध्यायादधीते" म्हणजे "उपाध्यायापासून (व्याकरण) शिकतो" हें म्हणणें बरोबर आहे पण "नटापासून अभिनय शिकतो" हें बरोबर नाही. "नटाचा अभिनय शिकतो" (नटस्य गायां शृणोति) असें म्हटलें पाहिजे. नाट्यकला "हीन" व तर्कशास्त्र "उच्च" अशी त्यावेळीं समजूत होती. म्हणून त्यावेळीं एकाद्याला नाटकें पाहण्यांत आनंद झाला तरी तो आनंद कमी प्रतीचा आहे असें वाटणें साहजिक होतें.

पण आजच्या समाजांत नाट्य व संगीत यांचें हीनत्व जाऊन उलट नट व गायक हींच लोकांचीं आराध्य दैवतें होऊं लागलीं आहेत. आजच्या काळांत नाट्यकलेचा आस्वाद घेणाऱ्याला किंवा संगीताच्या स्वराबरोबर ज्याची मनोवृत्ति थरारते, त्याला, आपला आनंद हीन दर्जाचा आहे असें वाटण्याचा संभव नाही. उलट "आपल्याला शास्त्रीय संगीत कळत नाही" असें कबूल करायचीच कांही लोकांना लाज वाटते. गाण्याच्या बैठकीला जाऊन मर्मज्ञ लोकांनी मान हलवली की तेहि मान हलवतील, त्यांनी "वाऽ" म्हटलें की तेहि "वाः" म्हणतील, व राग म्हणजे काय याचें "र" का "ट" कळत नसून देखील "गवईबुवा आता मालकंस होऊं द्या" म्हणून फर्माईश करतील. एखाद्या वेळीं मालकंसांतलें गाणें नुकतेंच संपलेलें असतें व गवई रागावून "मग आता काय रडत होतो ? " असें विचारून त्यांची फजीती करतो ही गोष्ट वेगळी. तात्पर्य, एखाद्या आनंदाबद्दल उच्चतेची वा नीचतेची भावना निर्माण होते हा त्या आनंदाचा अंगभूत व अपरिवर्तनीय गुणधर्म नाही. या भावना अनेकवेळां पूर्व संस्कारावर अवलंबून असतात. पूर्व संस्कारांपेक्षा वेगळे संस्कार मनावर झाले की या भावना बदलूं शकतात. पूर्वी जो आनंद "हीन" वाटत होता तोच आज "उच्च" वाटूं शकतो.

सोपे व कठीण आनंद

समाजाने श्रेष्ठ मानलेल्या आनंदाप्रमाणेंच ज्या आनंदाचा अनुभव येण्यास वरच्या दर्जाची बुद्धिमत्ता लागते तो आनंदहि वरच्या दर्जाचा समजला जातो. पेढा खाण्याचा आनंद प्रत्येकाच्याच आवाक्यांतला असतो, पण गणितें सोडवण्याचा आनंद किंवा तत्त्वज्ञान-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चर्चेचा आनंद अनुभवायला वरच्या दर्जाची बुद्धिमत्ता अंगीं असावी लागते; यामुळे पेढा खाण्यांत आनंद झाला तर आपल्याला त्याचें विशेष महत्त्व वाटत नाही, पण एखादें गणित सोडवण्यांत आनंद झाला तर इतरांपेक्षा आपल्यांत कांही विशेष बुद्धि आहे असें वाटून आपली आत्मगौरवाची भावना जागृत होते. गणिताचा आनंद उच्च दर्जाचा वाटतो याचें कारण त्या आनंदांत "उच्चता" नांवाचा कांही अंगभूत गुण-धर्म असतो असें नसून त्या आनंदाबरोबर आत्मगौर-वाचा आनंदहि उदित होतो हें आहे. जे बाल व वृद्ध, अज्ञ व सुज्ञ या सर्वांनाच आवडतें तें आपल्यालाहि आवडलें तर त्यांत आपली थोरवी ती काय ? अमुक अमुक थोर पुरुषाला आंबा आवडतो, उन्हाळ्यांत थंड हवेच्या ठिकाणीं राहणें आवडतें व हिवाळ्यांत उबदार कपडे आवडतात असें कुणीतरी कौतुकाने सांगत बसेल काय ? असें कुणीं सांगितलें तर ऐकणारे म्हणतील हें सर्व आम्हांलाहि आवडतें, त्यांत या थोर पुरुषाची एवढी थोरवी ती काय ? पण जर कुणी असें सांगितलें की हा थोर पुरुष करमणूक म्हणून ग्रीक भाषेचा अभ्यास करतो तर आपण एकदम म्हणूं "अरे बापरे ! ग्रीक ! एक इंग्रजी शिकतां शिकतांच आमच्या नाकीं नऊ आले. त्यांतून आजकाल जी कुणी बोलत नाही ती ग्रीक भाषा व त्यांतले ते प्लेटो, अरिस्टॉटल वगैरे रथीमहारथी यांच्याशीं सहज लीलेने गुजगोष्टी सांगणारा हा पुरुष खरोखरच थोर असला पाहिजे." जो आनंद सर्वसाधारण लोकांच्या आवाक्याबाहेरचा असतो त्या आनंदाबद्दल याप्रमाणे उच्चतेची भावना निर्माण होते.

आपण एखाद्या आनंदाची बालिश म्हणून टवाळी करतों ती देखील याच भावनेमुळे. अरेबियन नाइटस् लहान मुलांना आवडतात, त्यामुळे मोठेपणीं देखील त्यांच्यांत रंगून जाणाऱ्या एखाद्या माणसाला आपली आवड वयाबरोबर सुधारली नाही असें वाटतें; आपल्याला मोठेपणीं देखील अरेबियन नाइटस् आव-डतात त्याअर्थी आपल्यांत कांही तरी न्यून आहे अशी त्याला खंत वाटते. वस्तुतः एखादें वाङ्मय लहान मुलांना आवडतें हा त्या वाङ्मयाचा दोष असूं शकत नाही व एखाद्या आनंदाचा अनुभव घेण्याची पात्रता नाहीशी होणें हा गुण मानला जाऊं शकत नाही. लहान मुलांचे आनंद आज आपल्याला अनुभवतां येत नाहीत हें आपल्या विकासाचें लक्षण नाही, तो आपला एक दोष आहे, अपात्रता आहे. पण या अपात्रतेचें साहचर्य, वाढलेली बुद्धिमत्ता व वाढलेलें ज्ञान या गुणांशीं असल्यामुळे त्या अपात्रतेचेंच आपल्याला भूषण वाटूं लागतें व अरेबियन नाइटस् सारखें वाङ्मय वाचण्यांत होणारा आनंद कमी "प्रती"चा आहे ही कल्पना निर्माण होते. खरें पाहिलें तर हा आनंद कमी प्रतीचा नसून बुद्धिमत्ता व प्रौढता यांच्याबद्दल आप-ल्याला वाटणाऱ्या फाजील आदरामुळे त्याचा अवमान केला जातो.

आनंददायकता हाच कलेच्या श्रेष्ठत्वाचा एकमेव निकष मानावा लागतो. आनंददायकता आस्वादकाच्या अभिरुचीवर अवलंबून असतेः अभिरुचींत उच्च व नीच असे भेद करतां येत नाहीत व म्हणून लोकाभि-रुचीला बाजूस सारून कोणत्याहि कलाकृतीचें मूल्य ठरवायचा आम्हांला अधिकार आहे असें कुणाला वाटत असेल तर तो त्यांचा भ्रम आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

ल. वि. पांढरीपांडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त नागपूर,

सांस्कृतिक कार्यक्रम

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितीने यंदा कांही विशेष कार्यक्रम करण्याचें ठरविलें आहे. ह्या कार्यक्रमांचें उद्घाटन प्रि. श्री. ल. पांढरीपांडे यांच्या हस्तें शुक्रवार दि. १७ जून १९५५ रोजीं सायं. ६ वाजतां विदर्भ साहित्य मंदिरांत झालें.

या कार्यक्रमांतील पुढील व्याख्यानमाला विशेष उल्लेखनीय आहेत. (१) भारतीय साहित्य-शास्त्राचे विशेष, (२) महाभारतांतील काव्य आणि (३) संस्कृत नाटकांवरील व्याख्यानें. या व्यतिरिक्त आणखीहि व्याख्यानमाला मध्यप्रदेशांतील नामवंत साहित्यिकांच्या सहकार्यानें गुंफण्याची योजना समितीपुढे आहे.

शुक्रवार दि. १७ जून १९५४ रोजीं सायं. ६ वा. विदर्भ साहित्य मंदिरांत कै. गोपाळ गणेश आगरकर यांची पुण्यतिथि साजरी करण्यांत आली. प्रि. श्री. ल. पांढरीपांडे ह्यांनी अध्यक्ष-स्थान स्वीकारलें होतें. ह्या प्रसंगीं श्री. द. रा. गोमकाळे, प्रा. श्री. मा. कुळकर्णी आणि ॲड्. वसंतराव साठे ह्यांचीं आगरकर आणि त्यांचें कार्य ह्यावर भाषणें झालीं.

आपल्या समारोपाच्या भाषणांत प्रि. श्री. ल. पांढरीपांडे यांनी "आगरकरांच्या विचारसर-णीला धरून आणि आजच्या काळाला अनुरूप असे विचार धैर्यानें लोकांपुढे मांडण्याचें कार्य आता कोणी तरी केलेंच पाहिजे" असे तळमळीचे उद्गार काढले.

वि. सा. संघाला देणगी

शुक्रवार दि. १७-६-५५ रोजीं कै. आगरकर पुण्यतिथीच्या दिवशीं कै. आगरकरांचे नातू श्री. राम आगरकर यांनी अकरा रुपये आपल्या आजोबांच्या पुण्यस्मृतीप्रित्यर्थ वि. सा. संघाला देणगी म्हणून दिले.

वि. सा. संघ त्यांचा आभारी आहे.

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिति

(१) आगामी परीक्षा २० ऑगस्टला सुरू होत असून आवेदन पत्रें केंद्राधिकाऱ्यांकडे देण्याची जास्तींत जास्त मुदत १० जुलै आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(२) साहित्यपारंगत परीक्षा वर्षांतून एकदाच होत असून ती २१ जानेवारी ५६ ला होईल आवेदनपत्रें (सशुल्क १० रु.) जुलैंत स्वीकारलीं जातील. नागपूरला वाचनालय व वर्गव्यवस्था राहील. ह्या परीक्षेचा अभ्यास नागपूर विद्यापीठाच्या मराठी एम्. ए. शीं समकक्ष राहील.

(३) विद्यापीठाच्या पी. एच्. डी. समकक्ष संघाच्या 'आचार्य' परीक्षेस बसूं इच्छिणाऱ्यांना जुलैंत पत्रव्यवहार करावा.

(४) गतवर्षी विषय मान्य झालेले आचार्य परीक्षार्थी--(१) श्रीमती शंकुतला दिवाणजी, एम्. ए. (अमरावती), विषय-मराठी नाटकांतील स्त्रीसमाज जीवन; (२) श्रीयुत भा. पुं. आकलेकर पारंगत, रत्न (रत्नागिरी), विषय-नव काव्याचें नवें साहित्यशास्त्र. उभय विषयांकरिता मार्गदर्शक प्रा. भ. श्री. पंडित (अमरावती)

(५) आचार्यप्रबंध समिति--१९५५-५६(१) संचालक; (२) प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे; (३) प्रा. डॉ. वि. भि. कोलते; (४) प्रा. डॉ. मा. गो. देशमुख; (५) कार्यवाह.

पां. कृ. सावळापूरकर
संचालक

माणिक के. वैतुले
कार्यवाह

कै. भाऊजी दफ्तरी स्मृति संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

" युगवाणी " (Yugwani)   Regd. No. N 945

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन.

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी, अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ✶ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ